बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक १८ | बुधवार,दि.०६ एप्रिल २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# दहा दिवसापासून शेतकऱ्यांचे कुटूंब उघडयावर

## वडीलांच्या कर्जासाठी घराला ठोकले सील : अचानक केलेल्या कारवाईमुळे शेतकरी चिंतेत





**गोंदिया :** सततच्या नापिकीमुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे.दोन वेळच्या भाकरीची भ्रांत असलेल्या सहेसपूर येथील शेतकऱ्यांवर अचानक जप्तीची कारवाई करून घरालाच सील ठोकण्यात आले. त्यामुळे अंगाची लाही-लाही करणाऱ्या उन्हात दहा दिवसापासून शेतकरी कुटूंब उघडयावर आलेले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून खासगी कपंनीने केलेल्या या कारवाईच्या विरोधात परिसरात चांगलाच रोष व्यक्त केला जात आहे.

सहेसपूर येथील किसन लालन चौरे यांनी मंहिद्रा होम फायनांन्स या खासगी कंपनीकडून २०१५ मध्ये एक लक्ष रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यांचे वर्ष २०१६ मध्ये निधन झाले. कर्ज घेतांना संबधित व्यक्तीचा विमा काढला जातो. मात्र, महिंद्रा फायनांन्स कंपनीतर्फे कर्जदाराचा विमा न काढता कर्जदाराच्या मुलाचा विमा काढण्यात आला. अशिक्षित शेतकऱ्यांना याबाबतीत काहीच समजून आले नाही.दरम्यान कर्ज घेतल्यांनतर सदर कर्जाची परतफेड करण्यासाठी ३० नोव्हेंबर २०१५ रोजी रूपये १७ हजार २४० आणि त्यानंतर २१ जुलै २०१६ रोजी २० हजार ५०० रूपयांचा भरणा करण्यात आला.गरीब शेतकरी पुत्र अनिल चौरे यांचा संपूर्ण उदरनिर्वाह शेतीवरच आहे.

मात्र,सततच्या नापिकीमुळे त्यांना कर्जाची परतफेड करता आलेली नाही.दरम्यान कपंनीकडून कर्ज मागणीबाबत काहीच कार्यवाही करण्यात आली नाही. त्यातच कोव्हीड-१९ च्या काळात शेतकरी अधिकच डबघाईस गेले.त्यामुळे मजूरी नाही,शेतीतील उत्पन्न नाही, अशा स्थितीत शेतकरी अनिल चौरे यांनी कसाबसा आपल्या कुटूंबाचा सांभाळ केला.बेभरोशाच्या शेतीवर अवलंबून जीवनयापन करणे कठीण असल्याचे अनिल चौरे सध्या घरबांधणीच्या कामावर मजूरी करतात.दरम्यान अचानक कपंनीतर्फे २४ मार्च रोजी घराला सील करण्यात आले.घरातील वापराचे सर्व साहित्यही त्याच घरात राहीले.कसेबसे त्यांनी आवश्यक वस्तू बाहेर काढल्या.एक लक्ष रूपयांच्या कर्जासाठी त्यांनी आतापर्यत ३७ हजार ७४० रूपयांची परत फेड केली. मात्र, फायनांन्स कंपनी म्हणजे मृताच्या टाळूवरील लोणी खाणारे व्यापारी झालेले आहेत. सदर कर्जाची तीन ते चार पट आकारणी त्यांनी केली असल्याचे शेतकरी अनिल चौरे यांनी सांगितले. सततची नापिकी आणि अत्यंत हलाखिच्या परिस्थितीत जीवनयापन करणारे शेतकरी अनिल चौरे, त्यांची पत्नी सिंधूबाई चौरे हे कर्जाची परतफेड कशी करावी, या विवंचनेत आणि चिंतेत आहेत. उभ्या महाराष्ट्रात अनेक शेतकरी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करीत आहेत. राज्यात शेतकऱ्यांचा कुणी वालिच नाही. त्यातही अशा कंपन्या अव्वाच्या सव्वा आकारणी करीत असल्याचे पहावयास मिळते, अशा कपंन्यांवरच आता कारवाईची गरज असल्याचे परिसरात बोलले जात आहे.

### सापत्न वागूणक का?

शासन उद्योगपंतीचे लाखो रुपयांचे कर्ज माफ करते. मात्र, शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने वसूली केली जाते. त्यातही कर्ज दिले नाही तर घरावर जप्तीची कारवाई सुध्दा केली जाते. नुकतेच शासनाने १२ हजार कोटीचे अदानी समुहाचे कर्ज माफ केले. शेतकरी जगाचा पोशिंदा असून त्याच्यासोबत अशी सापत्न वागणूक का, असा सवाल यानिमीत्ताने उपस्थित होत आहे.

### प्रशासनही कंपनीच्या दीमतीला

कर्जाची वसूलीसाठी जप्तीची कारवाई करतांना जिल्हाधिकारी यांची परवानगी गरजेची आहे. सहेसपूर येथील गरीब शेतकरी यांचे घर सील करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी महिंद्रा फायनांस कंपनीला परवानगी दिलेली असल्याचे कळते. गरीब शेतकऱ्यांच्या हलाखिच्या परिस्थितीची जाण जिल्हाधिकारी यांना नसावी. त्यामुळेच त्यांनी असा टोकाचा निर्णय दिला. महिंद्रा फायनांस कपंनीला जप्तीची एकतफी कारवाई करण्यासाठी परवानगी देण्याऐवजी जिल्हाधिकारी यांनी गरीब शेतकरी व फायनांस कपंनीमध्ये समेट घडवून आणला असता तर त्यामुळे वेगळा आदर्श निर्माण करता आला असता. मात्र, बंगल्यात राहणाऱ्या जिल्हाधिकारी यांना गरीब शेतकऱ्यांचा कळवळा कसा येईल? खासगी फायनांस कंपनीला घराला सील ठोकण्याचे आदेश देवून जिल्हा प्रशासनही खासगी कपंनीच्या दीमतीला असल्याचेच यावरून कळते.

# महसूल कर्मचारी संपावर,कार्यालय ओसाड

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेने पुकारलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने आंदोलनाचा चौथा टप्प्यात सोमवारपासून (दि.४) सर्व महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.सलग दोन दिवसापासून कर्मचारी आंदोलनावर असल्याने महसुलविषयक अनेक कामावंर परिणाम दिसून येत आहे.त्यातच जिल्ह्यात सरळसेवेची ८१ व पदोन्नतीचे ५५ असे १३६ पदे रिक्त आहेत,त्यात जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयात महसूल सहायकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. परिणामी एक महसूल सहायकाकडे २ ते ३ संकलनाचा अतिरिक्त कार्यभार असून कर्मचारी तणावात आहेत. महसूल सहायक भरतीसाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील भरती करण्यास टाळाटाळ केली जाते. अव्वल कारकुन, मंडल अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नतीचे प्रस्ताव मंत्रलयात दीड ते दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिसून येते.शासन निर्णय महसूल व वन विभाग १० ते २०२१ अन्वये नायब तहसीलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व अव्वल कारकुन व मंडल अधिकारी यांच्या सेवाज्येष्ठता याद्या राज्यस्तरावर एकत्रित करण्याबाबत शासनाने पत्र काढले आहे..

परंतु अव्वल कारकुन व मंडल अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्यामुळे त्यांच्या याद्या राज्यस्तरावर एकत्रित करण्याची प्रक्रिया ही अन्यायकारक असल्याने ते पत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी आहे. यासाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही फक्त आश्वासन मिळत आहे. आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने नाईलाजास्तव आंदोलन सुरु करण्यात आले आहे.



**गोंदियात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तर प्रत्येक तालुक्यात तालुक्याच्या ठिकाणी हा संप करण्यात आला आहे.आंदोलनाचे नेतृत्व महसुल कर्म.संघटनेचे अध्यक्ष आशिष रामटेके, राकेश डोंगरे, मुकुंद तिवारी,आकाश चव्हाण,किशोर राठोड,जितेंद्र घासले,सुधीर रहांगडाले,अंशुल हिरकने,आनंद बोरकर,सारिका बन्सोड,अश्विनी पवार स्नेहा मेश्राम,अनुसया नागपुरे,गीता भंडारे,भारती चव्हाण, अजित भोवते,गुरुबेले,मेघराज राऊत करीत आहेत.**



# कुंजलेल्या अवस्थेत सापडला वाघाच्या बछडा

**भंडारा:** उमरेड करांडला अभयारण्य अंतर्गत पवनी वनपरिक्षेत्रात एका वाघिणीचा बछडा मृतावस्थेत कुजलेल्या स्थितीत आढळून आला.अवघ्या पाच दिवसांपूर्वीच एका वाघाची शिकार झाली होती त्यानंतर ही घटना नक्कीच वन्य प्रेमींसाठी हळहळ व्यक्त करणारी आहे. तुमसर वनपरिक्षेत्र अंतर्गत ३१ मार्च रोजी एक वाघ लघु कालव्यात मृतावस्थेत आढळून आला होता. चौकशीनंतर या वाघाची शिकार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले होते.

हा तपास सुरू असतानाच ४ एप्रिल रोजी उमरेड करहांडला अभयारण्यात वनपरिक्षेत्र अंतर्गत वाघाचा एक बछडा मृतावस्थेत आढळला. त्याचे शरीर पूर्णपणे कुंजलेल्या अवस्थेत होते. अंदाजे नऊ महिने वयाच्या या वाघिणीच्या बछडाचा मृत्यू वन्य प्राणी किंवा बिबट कडून मारला गेल्याने झाला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. हा बछडा नर की मादी हे मात्र स्पष्ट होऊ शकले नाही.

शाडो वाघिणीचा हा बछडा असून तीन बछड्यांसह ही वाघीण अनेकदा पर्यटकांना दिसल्याचे समजते. २ एप्रिल रोजी काही पर्यटकांना केवळ दोन बछड्यांचा दर्शन झाले होते.त्यामुळे दोन तारखेपुर्वी मृत्यू झाला असावा अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# शेतकरी अपघात विम्यासाठी ७.२८ कोटीची निधी मंजूर

**गोंदिया:** शेती करताना होणाऱ्या अपघातामुळे शेतकऱ्याला मृत्यू ओढवतो किंवा अपंगत्व स्वकारावं लागत. अश्या कालावधीत शेतकऱ्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती खालावते. त्यासाठी शासनाने शेतकरी अपघात विमा योजना सन २००५-६ मध्ये कार्यान्वित केली. मात्र डिसेंबर २०२० ते एप्रिल २०२१ या खंडित कालावधीमध्ये ज्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली होती, परंतु विमा निधी मिळाला नव्हता अशा जिल्ह्यातील २० प्रस्तावांना निधीचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने ३१ मार्चच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ७ कोटी २८ लाख रुपयांचा निधी वितरण करण्यास मंजुरी दिली आहे.

शेती करताना शेतकऱ्यावर नानाविध संकटे कोसळतात. त्याची करणे वेगवेगळी असू शकतात. जसे कि अंगावर वीज पडून मृत्यू येणे, नैसर्गिक आपत्ती, पूर, सर्पदंश, विंचू दंश, वाहन अपघात, रस्त्यावरील अपघात, विजेचा शॉक लागून मृत्यू अश्या वेगवेगळ्या कारणांमुळे शेतकऱ्याला अपंगत्व किंवा मृत्यू ओढवला जातो आणि शेतकरी कुटुंबाचा आधार जातो. त्यामुळे शेतकरी अपघात विमा योजनेचे कल्याणकारी स्वरूप लक्षात घेता, महाराष्ट्र सरकारने २००९-१० मध्ये या योजनेसाठी १ लाख एवढा विमा संरक्षित केला गेला होता.योजनेचे कल्याणकारी स्वरूप लक्षात घेत तत्कालीन भाजप सरकारने सन २०१५-१६ मध्ये ही रक्कम वाढवून २ लाख एवढी केली. जर शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाला असेल ,दोन डोळे किंवा दोन अवयव गमवावे लागले तर २ लाख रुपये किंवा एक डोळा व एक अवयव निकामी झाला असेल तर त्याला १ लाख विमा दिला जातो. जिल्ह्यातील उर्वरित असलेल्या २० प्रस्तावांच्या लाभार्थी कुटुंबांना लवकरच निधीचे वितरण करण्यात येणार आहे.सन २०२१-२२ या वर्षात ६८ प्रकरणे प्राप्त झाली आहे.

# राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या अधिवेशनात परमार शाखेच्या एकीकरणाला मान्यता

## राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे अखिल भारतीय अधिवेशन २०२२ भंवरामध्ये संपन्न







**गोंदिया:-** मध्य प्रदेशातील मालवा भागात स्थायिक झालेल्या परमार/पंवार समाजबांधवाना एकत्र करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्यावतीने आयोजित पंवार(परमार) क्षत्रिय महासभेच्या अखिल भारतीय अधिवेशनात एकीकरणाचा प्रस्ताव सर्वम्मतीने मंजूर करण्यात आला. या अधिवेशनाचे उदघाटन धार राजवंशाचे वशंज व पवार समाजाचे दीपस्तंभ डॉ.राजे करणसिंह पवार यांच्या हस्ते राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे अध्यक्ष इंजि.मुरलीधर टेंभरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनाला मध्यप्रदेशातील मालवा भागातील परमार समाजबांधवासह मध्यप्रदेश, महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यातील पोवार,पंवार,भोयर पवार समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ध्वजारोहण, दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



अधिवेशनाच्या उदघाटन समारंभात बोलतांना डॉ.राजे कर्णसिंह म्हणाले की आपल्याकडे सर्व समाजाचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. राजा भोज यांच्या बाबतीत असेच घडले. त्यांचे वर्णन करताना मुस्लिम राजांच्या काळात आम्ही परमार पंवार एकमेकांपासून वेगळे होऊन वेगवेगळ्या ठिकाणी स्थायिक झालो. तेव्हापासून एकमेकापासून दुरावले गेले होतो, मात्र या अधिवेशनातून आम्ही एकत्र येत एकमेकांशी जोळले गेले आहोत, हे नातेसंबध अधिक दृढ करण्याची जबाबदारी आपली असल्याचे म्हणाले. राजा भोज यांनी मध्य, उत्तर व दक्षिणभारतापर्यंत आपले साम्राज्याचे विस्तार केले होते, त्यामुळे आपण या भागासह उत्तराखंडातही दिसून येत असल्याचे सांगत सर्वांना एकत्र जोडण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराला आपण पाठिंबा देत आहोत. या एकीकरणातून रोटी बेटीव्यवहारसह, संस्कृती आणि भाषेसह ती स्वीकारण्याची घोषणा करून, हा प्रस्ताव मान्य करावा, असे त्यांनी जनसमुदायाला आवाहन केले.

अधिवेशाला अखिल भारतीय पंवार/परमार समरसता अधिवेशन व आयोजन समितीचे निमंत्रक रामनारायण परमार, बालाघाट-सिवनीचे खासदार डॉ.ढालसिंग बिसेन, मध्य प्रदेश राज्याचे शिक्षण व सामान्य प्रशासन राज्यमंत्री इंदरसिंग परमार, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे माजी अध्यक्ष तथा सरंक्षक इंजि.टी.डी.बिसे, शुजालपूर येथील रामनारायण परमार, आष्टा येथील कैलास परमार, अखिल भारतीय भोयर पवार महासंघाचे अध्यक्ष डॉ.नामदेवराव राऊत, दुर्गाप्रसाद परमार, देवीसिंह परमार, हरिनारायण परमार, आष्टा येथील डॉ.मानसिंग परमार, अजबसिंग परमार, लीलाबाई परमार, सरिता परमार, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा सरचिटणीस पुष्पा बिसेन, संघटन सचिव खेमेंद्र कटरे, उपाध्यक्ष सर्वश्री राजेंद्र पटेल, मोतीलाल चौधरी, एड. किरणलता चोपडे, कोषाध्यक्ष श्रावण फरकाडे, आंतरराज्य समन्वय समितीचे अध्यक्ष लेखसिंह राणा, सदस्य शंकर पवार, सहसचिव कैलास कौशिक, जितेंद्र बिसेन, मनोज भैरम, जनसंपर्क सचिव सर्वश्री सुनील गौतम, इंजि. सुखदेव पारधी, सदस्य सर्वश्री शैलेंद्रसिंह परमार, अर्पण बिसेन, एड. रुपेंद्र कटरे, आर.सी.पटले, जगदीशचंद्र पवार, पुष्पलता बारंगे, लक्ष्मीकांत नागरे, अजय डहारे, श्रीमती उषा पटले, कुंजिसिंग परमार व सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे अध्यक्ष अभियंता मुरलीधर टेंभरे यांनी राष्ट्रीय पवार महासभेच्या कामकाजाची माहिती देताना महासभेच्या मेंढा अधिवेशनात भोयर पवार समाज शाखेचे विलीनीकरण झाल्यानंतर भोयर पवार आणि पोवार/पवार समाज एकत्र उभा आहे. त्याचप्रमाणे परमार शाखेचे विलीनकरणासह सांस्कृतिक व संस्कारांचा समावेश करण्याचा प्रस्ताव २०२० च्या बैहर अधिवेशनात एकमताने मंजूर करण्यात आल्याची माहिती देत हे अखिल भारतीय अधिवेशन पवार समाजाच्या परमार या तिसऱ्या शाखेचे एकत्रीकरण करण्यासाठी असल्याचे सांगितले. तसेच समाजाच्या विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व सांगत महिलांनी चूल मूल यातून घराबाहेर पडून मुलींना नवा मार्ग दाखविण्याची गरज असल्याचे सांगत एकीकरणाचा प्रस्तावास सम्मंती देण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनाचे उद्देश व माहिती कैलाससिंह परमार यांनी सांगितले. यावेळी बोलतांना वैनगंगा, वर्धा किनारी भागातील समाज बांधवांसह मालवंचलमधील परमार समाज बांधवांनी या अधिवेशनात समाजाच्या इतिहासासोबत एकत्र येण्याची गरज लक्षात घेत विलिनीकरण प्रस्ताव इंजी.टी.डी.बिसेन यांनी ठेवले.

तर स्व.कन्हैयालाल बोवाडे यांनी त्यांच्या एकात्मतेसाठी केलेल्या कार्याचे स्मरण डॉ.नामदेव राऊत यांनी त्यांच्या विचारांतून होत असलेल्या अधिवेशातील एकीकरणाच प्रस्ताव फलीत असल्याचे म्हणाले.




खासदार ढालसिंग बिसेन यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आज पंवार पोवार समाज शैक्षणिक क्षेत्रात पुढे जात आहे, अशा परिस्थितीत मालवंचल भागातील आपला परमार समाज महिला शिक्षणातही पुढे येण्याची गरज आहे. बदलता काळ बघता आपल्या मुलींनी संस्कृती व परंपरेचे जतन करीत डोक्यावरील घुंघट काढून काळासोबत वाटचाल करुन नवा मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे. समाजाचा अभिमान बाळगून मध्यप्रदेश सरकारच्या बँड एम्बेसिडर असलेल्या एवरेस्टवीर मेघा परमारकडून मुलींना प्रेरणा घेण्याचा संदेश त्यांनी दिला.

मुख्य अतिथी म्हणून आपले विचार मांडतांना मध्य प्रदेश सरकारचे शिक्षण राज्यमंत्री इंदरसिंग परमन यांनी या अखिल भारतीय अधिवेशनाच्या माध्यमातून परमार समाजबांधव हा पंवार, भोयरपवारसोबत एकत्र आलेला आहे. जे काही वर्षे आपल्याच बांधवांपासून वेगवेगळ्या ठिकाणी गेले होते. आपल्या पूर्वजांनी इतिहास रचला. तो पुढे नेण्यासाठी काम करण्यासाठी, तसेच संस्कृती परंपरा आणि सम्राट विक्रमादित्य आणि चक्रवर्ती राजा भोज यांचा विचार समाजाच्या घराघरापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व विखुरलेल्यांना एकत्र आणण्यासाठी या अधिवेशनाने नवा इतिहास रचल्याचे म्हणाले. ज्यू आपले अस्तित्व टिकवण्यासाठी फिरत राहिले आणि भारताने त्यांना त्यावेळी आश्रय दिला, आज तोच ज्यू देश इस्रायल मजबूत झाला आहे, कारण त्यांनी एकजूट आणि एकसंध राहण्याचा मार्ग स्विकारला होता. तोच विचार आपल्याला एकत्रीकरणासाठी स्विकारायचा आहे. विचारमंथनासाठी आयोजित केलेले अधिवेशन मैलाचा दगड ठरले आहे. या अधिवेशनात महासचिव पुष्पा बिसेन, शंकर पवार, कैलासिंग परमार आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.यावेळी

माऊंट एव्हरेस्ट शिखर विजेती मेघा परमार,खेळाडू गुंजन परमार, रसना परमार, कपिल परमार, रामनाथसिंह ठाकूर यांचाही सत्कार करण्यात आला.

पवार दर्शन पत्रिका व श्री शक्तीसिंह पत्रकार यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित सर्व संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन दिलीपसिंग परमार, जगदीश परमार यांनी केले. या परिषदेत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान भागातील पोवार, भोयर पवार, पवार, परमार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागपूर, वर्धा, कारंजा, आर्वी, गोंदिया, भंडारा, छिंदवाडा, बैतूल, सरणी, मुलताई, भिलाई, रायपूर आणि इतर भागातील समाज बांधव उपस्थित होते. पृथ्वीराज रहांगडाले, भगवान बन्नगरे, तीर्थनंदन बन्नगरे, मनोज चव्हाण, प्रीतमभाऊ पटले, देवानंद टेम्भरे, विजय पटले, एस.एम. पारधी, जियालाल शरणागात, उषा पटले, मधुकर चोपडे, मोरेश्वर भादे, उषा बिसेन, प्रमोद पटले, दिनदयाल पारधी, दिलीप रहांगडाले, किशोर हजारे, शंकर कलाभूत, गजानन चौधरी, सुहास टोपले, एड. रुपेंद्र कटरे, प्यारेलाल गौतम,हैशोक शरणागत,आर.एल.पवार,हरकचंद टेंभरे, लखनऊ चौधरी, डॉ. भगवान ठाकरे, सुनील पटेल, राजाभाऊ शेंडे, रमेश बिसेन, सुनील चौधरी, माणिक अंबुले, दिगंबर कटरे, गौरव पारधी, विशाल बिसेन, विनय बिसेन, भोजलाल पारधीसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



## संपादकीय

# बोगस शिक्षक, बोगस विद्यार्थी बाबत गुन्हे दाखल कां होत नाहीत?

महाराष्ट्रातील पुणे,गोंदिया,भंडारा,गडचिरोली, धुळे नंदुरबार, जळगाव , नाशिक जिल्ह्यात बोगस टीईटी प्रमाणपत्र धारक बोगस शिक्षकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. राज्यभरातील अशा तब्बल ७ हजार ८८० बोगस शिक्षकांवर, बोगस अपंग युनिटच्या बोगस शिक्षकांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्यास राज्यशासन अद्याप तयार नाही.त्यातच गोंदिया जिल्ह्यात उघडकीस आलेल्या बोगस नौकरभरतीमधील शिक्षकांवर अद्यापही कुठलीच कारवाई केली गेली नाही.गेलीदोन वर्ष निव्वळ चौकशीचा फास फक्त दिसून येत आहे.शिक्षण संचालक व उपसंचालकांच्या संगनमताने झालेल्या या नोकरभरतीमध्ये शिक्षणाधिकारीसह शिक्षण उपसंचालक कार्यालय गुंथले गेल्याने पुर्व विदर्भात २०२० मध्ये उघडकीस आलेल्या बोगस नौकरभरतीवरही अधिवेशनात फक्त आश्वासनाच्या गाजराशिवाय काहीच मिळाले नाही.शिक्षक आमदार नागो गाणारांना शिक्षण मंत्री व राज्यमंत्र्यानी अधिवेशनात दिलेल्या उत्तरानुसारही कारवाई करण्यास टाळाटाळ केली गेली.त्याचप्रमाणे शिक्षण उपसंचालक तर कारवाईलाच संथगतीने नेत असल्याने अधिकारीच बोगस शिक्षक भरतीतील आरोपींना वाचवित असल्याचेच दिसून येत आहे.

त्याच प्रमाणे राज्यभरात आढळून आलेल्या तब्बल १९ लाख बोगस आधार कार्ड वाल्या विद्यार्थ्यांची पटावर नोंदणी करून त्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर भरती झालेले हजारो अतिरिक्त शिक्षक, मलीदा खाऊन त्यांची भरती करणारे संस्था चालक, त्यास मान्यता देणारे शाळा तपासनीस व शिक्षणाधिकारी या सर्वांवर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक असताना राज्य शासन या बाबतही अति टोकाची टाळाटाळ करीत आहे.

यात राजकारण्यांचेही संबंध असल्याने कारवाईची ही टाळाटाळ होत आहे काय? या सर्व बोगसगिरीच्या अतिरेकामुळे जनतेच्या मेहनतीच्या टॅक्स रकमेतून भरणाऱ्या राज्य शासनाच्या तिजोरीला हजारो कोटींचा खड्डा पडत आहे. बरं ही लूट एकदा होणारी नाही तर दरमहा होणारी ही लूट आहे. या प्रकारे वाया जाणारे हजारो कोटी रुपये वाचवून विकास कामांना वापरायचे, की कुणी मागणी केलेली नसताना, गरज नसताना, जनमताचा तीव्र विरोध असताना आमदारांसाठी मुंबईत घरे बांधून त्यांना द्यायला प्राधान्य द्यावयाचे? हा प्रश्न आम जनता विचारित आहे. हे १९ लाख बोगस विद्यार्थी व त्यावर आधारित अतिरिक्त शिक्षक प्रश्नी राज्य सरकार कारवाई करत नाही म्हणून आता नागरिक कोर्टात दाद मागत आहेत. औरंगाबादच्या उच्च न्यायालय खंडपिठात बीड जिल्ह्यातील ब्रिजमोहन मिश्रा यांनी याचिका दाखल केली आहे. त्यांनी या बाबत सीबीआय व सीआयडी मार्फत चौकशीची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे, की राज्यात १९ लाख विद्यार्थ्यांचे आधारकार्ड बोगस असल्याचे उघड झाले आहे. २९ लाख विद्यार्थ्यांची विना आधारकार्ड नोंदणी करण्यात आली आहे. ४० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक लागतो. राज्यात आज असलेले ४८ हजार ४६२ शिक्षक मग कोणत्या विद्यार्थ्यांना शिकवितात? असा प्रश्न या याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. या शिक्षक नियुक्त्यांमागे रॅकेट असल्याचा संशय व्यक्त होत आहे. शिक्षक नियुक्त्यांचे दर लाखोत असतात. त्यामुळे राज्यात शिक्षक नियुक्त्यांसाठी बोगस विद्यार्थी पटावर दाखविण्याची स्पर्धा लागली होती. महाभ्रष्ट शिक्षण विभाग यात सामिल होता. दहा वर्षापूर्वी महसूल व अन्य विभागाकडून राज्यभरात एकाच दिवशी प्रत्यक्ष जागेवर पट तपासणी मेघा मोहिम झाली होती. तेव्हा तब्बल २० लाख बोगस विद्यार्थी पटावर आढळले होते. त्यानंतर आधार कार्डवर विद्याथी नोंद सुरू झाली. तर बोगस आधार कार्डवर विद्याथी नोंदणीची लाटच आली. त्यात विद्याथी संख्या कमी होण्या ऐवजी उलट वाढली. अखेर २०१५ मध्ये पवित्र पोर्टल प्रणाली आली. त्यात ८६.०८ टक्के आधार कार्ड नोंदणी झाली. एकूण २ कोटी १० लाख विद्याथी संख्येपैकी १ कोटी ८३ लाख ७५ हजार ८२५ विद्यार्थ्यांची आधार नोंदणी झाली आहे. त्यापैकी ७२ लाख ३८ हजार ५४८ पैकी ५३ लाख ४६ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध आढळले. १९ लाख ३८ हजार ५०२ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बोगस आढळले आहेत. आता या प्रकारे बोगस आधार कार्डच्या आधारावर पटावर विद्यार्थी नोंदविणे. त्या बोगस विद्यार्थी संख्येच्या आधारावर शिक्षक नियुक्त करणे त्याचा दरमहा पगार घेणे. अशा बोगस गिरीस शिक्षण खात्याने मान्यता देणे. या सर्व बाबी अनावधानाने घडू शकत नाहीत. या बाबी हेतू पूर्वक, वाईट लाभाच्या उद्देशाने, शासनाच्या तिजोरी वर डल्ला मारण्याच्या उद्देशाने झालेल्या आहेत. खरे तर याबाबी उघड झाल्या झाल्या राज्यभर फसवणूक प्रकरणी भादवि ४२०, १२० ब, ३४ व अन्य कलमान्वये गुन्हे दाखल व्हायला हवे होते. कां झाली नाही ही कारवाई? सरकार कुणाची वाट पाहात आहे? काय हवे आहे राज्यकर्त्यांना? असे प्रश्न मग सामान्य माणूस सहजपणे विचारु शकतो. राज्य शासन इतक्या गंभीर प्रकरणात थंड आहे, म्हणून नागरिकांना हायकोर्टाचे दरवाजे ठोठवावे लागत आहेत! कारवाई तर झालीच पाहिजे!

# राज्यभरात ओबीसी संघर्ष रथयात्रा काढून जनजागृती करणार

## ७ मे रोजी मुंबईत एल्गार मोर्चाने होणार समारोप

**सोलापूर :** ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी ५ एप्रिल ते १७ मे या काळात राज्यभरात ओबीसी संघर्ष रथयात्रा काढून जनजागृती करण्यात येणार आहे. पाच एप्रिल रोजी सकाळी १०.१० वाजता तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद घेऊन या रथयात्रेची सुरुवात होणार आहे. ७ मे रोजी मुंबई येथे आझाद मैदानावर याचा एल्गार मोर्चाने समारोप होणार असल्याची माहिती ज्योती क्रांती परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रमेश बारसकर यांनी दिली. तसेच याप्रश्नी केंद्र व राज्य सरकार वेळकाढूपणा करत असल्याचा त्यांनी आरोप केला.

बारसकर म्हणाले, देशात ७२ टक्के असलेल्या ओबीसी समाजाला आरक्षणासह इतर सुविधा देण्याची शिफारस बी. पी. मंडल आयोगाने केली होती. १९८९ मध्ये व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मंडल आयोगाचा प्रस्ताव मान्य करून ओबीसींना आरक्षण मंजूर केले. तेव्हा आरक्षणाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात ३१ याचिका दाखल झाल्या. त्या निकाली निघण्यासाठी १९९२ साल उजाडले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ओबीसींना ४५ वर्षे आरक्षणासाठी वाट पाहवी लागली. आरक्षण मिळून २५ वर्षे झाली नाहीत तोच राज्यातील




स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण काढून घेतले आहे. यापुढील काळात शैक्षणिक आणि नोकऱ्यांमधील आरक्षण काढून घेतले जाईल, अशी भीतीही बारसकर यांनी व्यक्त केली.

याप्रश्नी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी तुळजापूर ते मुंबईतील आझाद मैदानापर्यंत ओबीसी संघर्ष रथयात्रा काढत आहोत. यात राज्यातील ओबीसी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी उस्मानाबादचे माळी समाजाचे नेते महादेव माळी, नाभिक समाजाचे नेते लक्ष्मण माने, तेली समाजाचे नेते रवी कोरे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष विशाल शिंगाडे, उद्योजक बाळासाहेब चिकलकर, मारुती रोकडे, ओबीसी सेलचे तुळजापूर तालुकाध्यक्ष विकी घुगे, महेश माळी, महादेव माळी, खलील सय्यद, माजी नगरसेवक अतुल क्षीरसागर, शीलवंत क्षीरसागर, जितेंद्र अष्टुळ, सागर अष्टुळ, उमेश गोटे, सुलतान पटेल, इशान खरकदारी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अतुलचंद्र कुमार यांचे योगदान



## नातवाने जपल्या आजोबांच्या आठवणी

या देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतुन मुक्त करण्यात स्वातंत्र्य सैनिकांचे फार मोठे योगदान आहे. देशाच्या या स्वातंर्त्य लढ्यात नेताजी सुभाषचंद्र बोस हे सुद्धा प्रमुख स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांना या कार्यात अनेक महान क्रांतिकारकांनी साथ दिली. त्यांत एका स्वातंत्र्य सैनिकाचे महान योगदान होते. त्यांचे नाव आहे अतुलचंद्र कुमार. ते आज आपल्यात नाहीत. परंतु त्यांचे नातू सौम्यजीत ठाकुर हे नागपुरात प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांच्याकडे त्यांच्या आजोबांच्या अनेक आठवणी असुन देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांच्या आजोबांच्या योगदानाचा त्यांना फार अभिमान आहे.

अतुल बाबु यांचा जन्म ५ एप्रिल १९०५ रोजी पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यातील अराईडांगा येथे दिनानाथ कुमार आणि कत्तयायनी देवी यांच्या पोटी झाला. बालपणा पासुनच त्यांचे गुण पाळण्यात दिसु लागले. १९२१साली त्यांनी गांधीजींच्या असहयोग आंदोलनात सक्रिय भाग घेतला. मॅट्रिक नंतर त्यांनी बेरहमपुर येथील कृष्णनाथ कॉलेजमध्ये प्रवेश केला. जिथे त्यांनी विद्याथी संघटनाची स्थापन केली आणि सचिव म्हणून काम केले. या क्षमतेमध्ये त्यांनी सरोजिनी नायडू आणि चित्तरंजन दास यांसारख्या नेत्यांना विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती निर्माण करण्यासाठी आमंत्रित केले.

बंगालच्या तत्कालीन गवर्नर स्टॅनली जॅकसन याने भारता विरोधात भाषण केल्याने एका कार्यक्रमात त्यांना बुट फेकून मारले. त्यासाठी त्यांना महाविद्यालयातून निष्कासनाचा सामना करावा लागला. त्यामुळे त्यांनी कोलकत्यातील बंगबाशी महाविद्यालयातून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी ऑल बेंगॉल स्टुडेंट्स युनियनचे सहायक सचिव म्हणुन काम केले तर १९२८ मधे अराईडांगा परिसरात दिनानाथ भोलानाथ मॉडेल अकादमी शाळेची स्थापना केली. अराईडांगा सारख्या दूरच्या क्षेत्रात आधुनिक शिक्षणाच्या प्रसारणात हा मोठ्या योगदान होता. १९३० मधे त्यांनी मिठाच्या सत्याग्रह आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यासाठी त्यांना एका वर्षाची कैद झाली. सायमन कमिशनच्या विरोधात विद्यार्थ्यांची एकजूट केल्याने त्यांना पुन्हा कारावास भोगावा लागला. मालदा जिल्हा कॉंग्रेस कमेटीत कार्यरत अस्ताना त्यांनी असहयोग करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी त्याला बऱ्याच वर्षांपासून तुरुंगात टाकण्यात आले आणि १९३६ मध्येच त्याला सोडण्यात आले. कारावास दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस आणि इतर क्रांतिकारकांच्या स्थळ आणि कार्यकलापांबद्दल माहिती जाणून घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात छळ केले. परंतु ते काहीही माहिती त्यांच्याकडून मिळवु शकले नाही.

१९३७ ते १९४६ पर्यंत ते बंगाल विधानसभेचे आमदार म्हणुन कार्यरत होते.१९३८-३९ दरम्यान त्यांनी कॉंग्रेसच्या हरिपुरा आणि त्रिपुरी सत्राचे अध्यक्ष पदासाठी नेताजींच्या निवडणूक सक्षम केले. ऑगस्ट १९३८ मध्ये त्यांनी नेताजी सोबत चीनमध्ये एक वैद्यकीय प्रतिनिधीमंडळ पाठवण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली. चीन-जपानी युद्धादरम्यान हा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चिनी लोकांसाठी समर्थनाचा प्रतीक होता.

१९४२-४३ या काळात ए. के. फजलुल हक आणी ख्वाजा नाझीमुद्दीन यांच्या मंत्रिमंडळात अतुलबाबुंनी महत्त्वाचे खाते सांभाळले. भारतातील शिक्षणाचे सांप्रदायिकरण हा मोहम्मद अली जिनाहची वाईट योजना होती. अतुल बाबूंनी फजलुल हक आणि शरतचंद्र बोस सोबत त्यांच्या वाईट योजनेचा भंग केला. ऑक्टोबर १९४३ मध्ये नेताजींनी बर्मा मोर्च्यावरील मद्रासचे टी. के. राव ला जपानी पाणबुडीत कठियावाड तट वर अतुल बाबु आणि त्यांचे सहकाऱ्यांना महत्वाचे कागदपत्रे व निर्देश देण्यासाठी पाठविले. पण त्यांच्या सहकाऱ्यांना अटक झाली म्हणून फक्त अतुल बाबू ही कागदपत्रे प्राप्त करण्यास आणि नेताजींच्या निर्देशांचा पालन करण्यास सक्षम झाले.

१९४० च्या दशकाच्या अखेरीत नेताजी सुभाषचंद्र बोस भारतीय राजकारणातुन दूर जात असतांना ते सामाजिक कार्याकडे वळले. सामाजिक कार्यात पण अतुल बाबुंचा मोठा योगदान होता. बंगालच्या लोकांवर त्यांचे मोठे प्रेम होते. पूर व दुष्काळ यांसारख्या आपत्तीमध्ये त्यांनी लोकांना मोठ्या प्रमाणात मदत केले. थोड्या सहकार्यांसह तो जलप्रलयातून धोकादायक मार्गाने प्रवास केला आणि वार्षिक पूरांदरम्यान अनेक जीव वाचविले. १९५० च्या दशकाच्या अखेरीत त्यांनी कॉंग्रेस सोडली आणि सी. राजागोपालाचारी यांच्या स्वातंत्र्य पक्षात शामिल झाले. १९५५ मध्ये त्यांनी दरभंगाच्या महाराजा कामेश्वर सिंहच्या निर्देशात 'मिथिला इन इंडिया' हा पुस्तकांचा सहलेखन केले आणि सोवियत संघाचे नेते निकोलाई बुल्गनीन आणि निकीता कुश्चेव यांनी हे पुस्तक सादर केले. आचार्य विनोबा भावे यांच्या१९६२ मालदा भेटी दरम्यान, त्यांनी त्यांच्या बैठक आणि क्रियाकलापांचे समन्वय केले. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी भाड्याने जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना छळणाऱ्या जमीनदारांचा सामना करीत त्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला.

१६ सप्टेंबर १९६७ रोजी देशाच्या हा महान सुपुत्राने कोलकाता येथे अंतिम श्वास घेतला. पश्चिम बंगाल सरकारने त्यांच्या स्मृति साठी मालदा येथील मोकदुमपुर मार्केटचे नामकरण 'अतुल मार्केट' असे ठेवले. सौम्यजीत पण आपल्या आजोबांचा आदर्शावर चालत आहे आणि समाजासाठी महत्त्वाची योगदान देण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याच्याकडे आजोबांचे पत्र, ऑडियो रेकॉर्ड तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस आणी अतुलबाबुंच्या छायाचित्रांच्या संग्रह असुन तो त्याने प्राणपणाने जपुन ठेवला आहे.


# महान विरांगना राणी झलकारीबाई

**जन्म: २२ नोव्हेंबर १८३०, मृत्यू: ४ एप्रिल १८५७**

राणी लक्ष्मीबाईच्या नियमित सैन्यात महिला शाखा दुर्गा दलाची सेनापती भारतीय स्वतन्त्रता सेनानी झलकारीबाई ही एक स्त्री लढवय्यी होती . जिने १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात एक महत्त्वाची भूमिका बजावली. तिने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या स्त्री लष्करात काम केले. हिचा जन्म कोळी समाजात झाला. पुढे ती झाशीची राणी लक्ष्मीबाईची एक प्रमुख सल्लागार बनली. झाशीच्या किल्ल्याचे युद्ध पेटलेले असताना, ती स्वतः राणी म्हणून गादीवर बसली आणि राणीच्या बाजूने आघाडीवर लढली, त्यामुळे राणीला किल्ल्यातून पळून जाणे शक्य झाले.

झलकारीबाई संबंधातील कथा कित्येक शतके बुंदेलखंडातील लोकांच्या स्मरणात आहेत. तिचे आयुष्य, खास करून राणीला वाचवण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या सेनेशी लढतानाचे तिचे धैर्य, याची बुंदेली लोकसाहित्यात आजही स्तुती केली जाते. तिचे शौर्य आणि तिची कोळी ही ओळख यामुळे उत्तर भारतातील शाक्यांमधे स्वाभिमान आणि सांस्कृतिक ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

झाशीजवळ असलेल्या भोजला गावामध्ये २२ नोव्हेंबर १८३० मध्ये सदोबा सिंग आणि जमुना देवी यांच्या पोटी झलकारीबाईचा जन्म झाला. एका खेडेगावातल्या मुलीच्या वाट्याला येतात ती सर्वच कामे झलकारी करत असे. तरी तिच्या लहानपणामध्येच तिने काही अचंबित करणाऱ्या बाबी करुन आपल्याकडे इतरांचे लक्ष वेधले होते. स्थानिक लोक गीतांमध्ये झलकारीच्या वीरतेविषयी अनेक उदाहरणे गायली जातात. झलकारीने कमी वयातच वाघाला




कुऱ्हाडीने मारल्याची कथा सांगितली जाते. तसेच झलकारी गाय वळायला गेली असताना तिने एका चित्त्याला काठीने मारल्याची कथाही तेव्हढीच प्रसिद्ध आहे. राणी लक्ष्मी बाईच्या सैन्यातील तोफखान्याचा काम करणाऱ्या पुरण सिंग नावाच्या सैनिकाशी तिचा विवाह झाला होता. ज्याने झलकारीची ओळख राणी लक्ष्मी बाईशी करुन दिली होती. झलकारी लक्ष्मीबाई सारखीच दिसायची आणि ह्यामुळे तिला लक्ष्मीबाईच्या स्त्रियांच्या पलटणीमधे सहभागी करुन घेतले गेले.

राणीच्या सैन्यात तिला वेगाने बढती मिळत गेली आणि लवकरच ती स्वतःच्या सैन्याच्या तुकडीचे नेतृत्व करु लागली. १८५७ च्या बंडाच्या दरम्यान ह्युज रोज यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने झाशीवर आक्रमण केले त्या दरम्यान राणी तिच्या किल्ल्यात स्वतःच्या ४००० सैनिकांसह दबा धरुन बसली होती. कल्पी या गावात छावनी टाकून बसलेल्या पेशव्यांचे सैन्य सोडवणूक करेल या अपेक्षेने लक्ष्मीबाई वाट पहात राहिली. परंतु पेशव्यांचे सैन्य येवू शकले नाही, कारण ते जनरल रोज कडून आधीच हारवले होते. दरम्यान झाशीच्या किल्ल्याच्या एका दरवाज्याची सुरक्षा पाहणारा "दुल्हा जू' याने इंग्रजांशी हातमिळवणी केली आणि झाशीच्या किल्ल्याचा दरवाजा उघडला. जेव्हा ब्रिटीशांचे सैन्य किल्ल्यात शिरले, किल्ल्यात इंग्रजांचे सैन्य झाशीची सैन्य ह्यांमध्ये समोर-समोरचे युद्ध सुरु झाले.

ह्या गोंधळाचा फायदा घेत आणि दरबारी व्यक्तींचा सल्ला ऐकत लक्ष्मीबाई मागच्या दरवाज्याने पळून गेली. लक्ष्मीबाईच्या जागेवर झलकारी आली, तिने लक्ष्मीबाईसारखाच पोशाख केलेला होता. झलकारीने लक्ष्मीबाईशी असलेल्या तिच्या साधर्म्याचा फायदा घेत स्वतः राणी लक्ष्मीबाई असल्याचे भासवत पुर्ण दिवस लढाई चालू ठेवली.

गेल्या काही वर्षात झलकारीबाईच्या प्रतिमेने उत्तर भारतात महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. झलकारीबाईच्या कथेचे सामाजिक-राजकीय महत्त्व मान्य करण्यात आले आहे. झलकारीबाईचा मृत्यूदिन अनेक कोळी संघटना "शहीद दिवस" म्हणून साजरा करतात. बुंदेलखंड या वेगळ्या राज्याची मागणी करणाऱ्या चळवळी देखील झलकारीबाईची कथा बुंदेली अस्मितेच्या निर्मितीसाठी वापरत आहेत. भारत सरकारच्या डाकतार विभागाने झलकारीबाईची प्रतिमा असलेले पोस्टाचे तिकिट काढले आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग पंच महल येथे झाशीच्या किल्ल्यात झलकारीबाईच्या स्मरणार्थ एक पाच मजली संग्रहालय बांधत आहे. बी. एल. वर्माच्या १९५१ मध्ये लिहिलेल्या "झांसी की रानी" या कादंबरीत झलकारीबाईचा उल्लेख आहे आणि त्यात तिच्यावर उपकथानक तयार केले आहे. त्यांनी झलकारीबाईचा उल्लेख कोळीण आणि लक्ष्मीबाईच्या सैन्यातील एक सामान्य सैनिक असा केला आहे. राम चंद्र हेरन यांची त्याच वर्षी प्रकाशित झालेली "माटी" ही बुंदेली कादंबरी तिला एक "लढवय्यी आणि शूर शहिद" असे चित्रित करते. झलकारीबाईचे पहिले चरित्र १९६४ मध्ये भवानी शंकर विशारद यांनी, वर्मांची कादंबरी आणि झाशीच्या आसपासच्या कोळी समाजाच्या मौखिक कथांवर संशोधन करून लिहिले.

झलकारीबाईची कथा सांगणाऱ्या कथा लेखकांनी झलकारीबाईला लक्ष्मीबाईच्या पातळीवर आणून पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. १९९० च्या दशकापासून झलकारीबाईच्या कथेने कोळी स्त्रीत्वाच्या उग्र स्वरूपाच्या आदर्श उभा करण्यास सुरुवात केली. ज्याला राजकीय परिमाण मिळाले आणि तिच्या प्रतिमेची सामाजिक परिस्थितीतून येणाऱ्या गरजेप्रमाणे पुनर्निर्मिती सुरु झाली. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी १० नोव्हेंबर २०१७ रोजी भोपाळ मधील गुरू तेग बहादुर

# तहसीलदार मेश्राम यांना सर्वोत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार



**अर्जुनी-मोरगाव:-** येथील तहसीलदार विनोद मेश्राम यांना नागपूर विभागातून सर्वोत्कृष्ट तहसीलदार म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. वनामती नागपूर येथे शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

वनामती नागपूर येथे २५ व २६ मार्च रोजी विभागीय महसूल परिषद संपन्न झाली. यात नागपूर विभागातील सहा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार उपस्थित होते. न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, सर्वोच्च न्यायालयाचे सेवानवृत्त न्यायमूर्ती भारत, विभागीय आयुक्त प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांच्या हस्ते नागपूर विभागात सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यात तहसीलदार श्रेणीत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अर्जुनी मोरगाव उपविभातील तहसीलदार विनोद मेश्राम यांना प्रदान करण्यात आले.

## नाभिक समाजासाठी अभ्यासगट नेमणार-मुंडे

**मुंबई:** नाभिक समाजाचा अभ्यास करण्याबाबत लवकरच अभ्यास गट नेमण्याचा निर्णय घेण्यात येईल तसेच नाभिक समाजाने केलेल्या विविध मागण्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन या समाजाचे विविध प्रश्न सोडविण्याची ग्वाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.नाभिक समाजाच्या प्रश्नांबाबत सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात बैठक पार पडली त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, सहसचिव दिनेश डिंगळे, समाजकल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये, नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे, दामोदर बिडवे, सुरेंद्र कावरे यासह या समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री श्री.मुंडे म्हणाले, सामाजिक न्याय विभागातंर्गत उच्चस्तरीय समिती नेमून नाभिक समाजाच्या जातीच्या वर्गवारी संदर्भात सर्वानुमते निर्णय घेण्यात येईल. नाभिक समाजासंदर्भात बार्टीने केलेला अभ्यास तसेच समाजाने सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी मांडलेल्या सूचनांबाबत कार्यवाही करण्यात येईल. अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये अ, ब, क, ड वर्गवारी करून नाभिक समाजाला ठराविक आरक्षण मिळावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही सामाजिक न्याय मंत्री श्री. मुंडे यांनी बैठकीत दिली.

# उद्योगपती आणि कार्यकारी संचालक :-जोतीराव फुले



जोतीरावांच्या कंपनीनं केलेली महत्त्वाची कामं म्हणजे कात्रजचा बोगदा, येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा होय.

जोतीरावांच्या उद्योगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही. ख्यातनाम विचारवंत डॉ. रामचंद्र गुहा यांनी जोतीरावांना आधुनिक भारताचे "शिल्पकार" मानलेले आहे. डा.बाबासाहेब आंबेडकर त्यांना गुरूस्थानी मानायचे आणि फुले यांचा वारसा आपण कायम उराशी बाळगू असे अभिमानानं सांगायचे. १९३२ साली पुण्यात बोलताना महात्मा गांधी म्हणाले होते, "जोतीराव फुले देशके पहले महात्मा थे. असली महात्मा वोही थे." स्वातंत्र्यवीर सावरकरांनी फुल्यांना "समाज क्रांतिकारक" म्हणून गौरविले होते. तीन अगदी भिन्न वैचारिक छावण्यांमधील या नेत्यांनी फुल्यांचा गौरव केलेला आहे.

जोतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ ला झाला. अवघ्या दहा वर्षांनी या घटनेला २०० वर्षे पूर्ण होतील. त्यांना ६३ वर्षांचे आयुष्य लाभले. कोणताही महापुरूष हा त्या काळाच्या मर्यादांनी वेढलेला असतो. फुले द्रष्टे, योद्धा आणि समाजक्रांतिकारक असले तरी त्यांनाही काळाच्या मर्यादा होत्याच. आज त्यांचा कालातीत वारसा कोणता याचा विवेक करायला हवा. आजच्या जागतिकीकरणाच्या संघर्षशील जिवनात असे काही फुल्यांकडून आपल्याला मिळण्याची शक्यता आहे काय? असल्यास किती आणि कोणत्या गोष्टी याचा विचार करायला हवा.

जोतीरावांनी सर्वांना शिक्षण, ज्ञाननिर्मिती, कौशल्यनिर्मिती, स्त्री-पुरुष समता, जातीनिर्मुलन, संसाधनांचे फेरवाटप, धर्मचिकित्सा आणि आंतरजातीय विवाह या कार्यक्रम पत्रिकेच्या आधारे आधुनिक भारताच्या पायाभरणीचं काम केलं.

जोतीराव आयुष्यभर विनावेतन आणि विना मानधन पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते राहिले. त्यांनी स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून समाजकार्य केलं. ते 'पुणे कमर्शियल आणि कॉंट्रॅक्टींग कंपनी'चे [Pune commercial & contracting Company] कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती, व्यापारी आणि नामवंत शेतकरी म्हणून जोतिरावांचा नावलौकिक होता. या कंपनीने धरणं, कालवे, बोगदे, पूल, इमारती, कापडगिरण्या, राजवाडे, रस्ते आदींची भव्य आणि देखणी बांधकामं केली. जोतीरावांच्या उद्योगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही. जोतीराव हे स्वत:च्या तेलानं जळणारे सामाजिक कार्यकर्ते होते. वर्गणीवर समाजकार्य करण्याची प्रथा तोवर निर्माण झालेली नव्हती. स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून त्यांनी समाजकार्य केलं.

"बिल्डर' हा शब्द आज वेगळ्या अर्थानं प्रचलित झालेला आहे. त्याला "आदर्श' रूप प्राप्त झाल्यानं तो वापरताना काळजी घ्यावी लागते. जोतीराव हे मूलत: एक "नेशन बिल्डर' होते. त्यांच्या कंपनीचे भागीदार असलेले वा सत्यशोधक समाजाचे सदस्य असलेले अनेक मान्यवर बांधकाम क्षेत्रावर आपली मोहर उमटवून गेले आहेत. मुंबई महानगरपालिकेची मुख्य इमारत, भायखळा पूल आणि परळचे रेल्वे वर्कशॉप, मुंबईतील अनेक कापडगिरण्या, भंडारदरा जलाशय, बडोद्याचा सयाजीराव गायकवाडांचा लक्ष्मीविलास राजवाडा, आदींची बांधकामे सत्यशोधकांनी केलेली आहेत. राजू बाबाजी वंजारी यांनी मुंबईतील टाइम्स ऑफ इंडियाची इमारत, सोलापूरची लक्ष्मी विष्णू मिल आणि लक्ष्मीदास खिमजी यांच्या मुंबईतील कापड गिरण्या बांधल्या. हे सर्वजण जोतीरावांचे निकटचे स्नेही आणि जोतीरावांच्या कंपनीचे भागीदारही होते. त्यांनी सत्यशोधक चळवळीला फार मोठे योगदान दिलेलं आहे. जोतीरावांच्या कंपनीनं केलेली महत्त्वाची कामं म्हणजे कात्रजचा बोगदा, येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा होय. पूल, धरणे, कालवे, बोगदे आणि रस्ते व सुंदर इमारती यांसारखी अनेक दर्जेदार बांधकामं त्यांनी केली. त्यातून मिळविलेली रक्कम सामाजिक कामासाठी मुक्त हस्ते खर्चून टाकली.

जोतीरावांच्या या कंपनीतर्फे पुस्तक प्रकाशनाचंही काम केलं जाई. बौद्ध विचारवंत अश्वघोष यांच्या वज्रसूची या जगप्रसिद्ध ग्रंथावर आधारित पुस्तक तुकाराम तात्या पडवळ यांनी १८६५ साली लिहिलं. जोतीरावांनी ते "जातीभेद विवेकसार' प्रकाशित केलं. या कंपनीचं पुण्यात पुस्तकविक्री केंद्र होतं.

**सोन्याचे दागिने बनविण्याचे साचे विकण्याची एजन्सी जोतीरावांकडे होती.**

ही कंपनी भाजीपाला विक्री व पुरवठा यांचेही काम करीत असे. एक अव्वल दर्जाचे यशस्वी व्यापारी, उद्योगपती आणि नामवंत शेतकरी म्हणून जोतीरावांचा नावलौकिक होता. सामाजिक कार्यकर्ता आणि यशस्वी उद्योगपती असा संगम फार विरळाच म्हटला पाहिजे.

कितीतरी मोठी कामं या कंपनीमार्फत त्यांनी केल्याच्या कागदोपत्री नोंदी मिळालेल्या आहेत. १५० वर्षांपूर्वी कृषी-औद्योगिक शिक्षणाचा आग्रह धरणारे फुले हे आधुनिक भारताच्या कृषी-औद्योगिक प्रगतीचे द्रष्टे शिल्पकार ठरतात. भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांना पहिली कामगार संघटना बांधायला जोतिरावांचेच प्रोत्साहन होते.

नेल्सन मंडेला आणि बराक ओबामा भारत भेटीवर आलेले असताना आपण त्यांना फुले यांनी १८७३ साली १४४ वर्षांपुर्वी लिहिलेल्या "गुलामगिरी" ह्या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद भेट दिला. ते दोघेही भाराऊन गेले. फुले यांनी हे पुस्तक निग्रोमुक्तीच्या चळवळीला अर्पण केलेले आहे. संपुर्ण आशिया खंडातील हा एकमेव विचारवंत आहे की ज्यानं दिडशे वर्षांपुवी विचारांचं जागतिकीकरण केलेलं होतं.

डॉ. जी.एस.घुर्ये आणि डॉ. एम.एन. श्रीनिवासन यांच्या अनेक वर्षे आधी महात्मा जोतीराव फुले यांनी भारतीय समाजाचं विशेषत: जातीव्यवस्थेचं ज्या पद्धतीनं शास्त्रीय विश्लेषण केलं होतं ते पाहता, जोतीराव हेच आद्य भारतीय समाजशास्त्रज्ञ ठरतात. त्यांचं हे लेखन आंतरराष्ट्रीय दर्जाचं आहे.

**प्रा. हरी नरके**

# आमदारांच्या घरासाठी 'भीक मांगो', ओबीसी क्रांती मोर्चाचे लक्षवेधी आंदोलन



**भंडारा:–** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना घरकुलाच्या लाभासाठी वणवण भटकंती लागत असताना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी ३०० आमदारांना मुंबई येथे घरे बांधून देण्याची घोषणा केली. पुर्वीपासूनच भरमसाठ मानधन, अनेक भत्ते, पेन्शन, आमदार निवासस्थान असतानाही आमदारांच्या गरजा भागत नसतील तर आम्ही भीक मांगून त्यांच्या गरजा पूर्ण करणार असे म्हणत ओबीसी क्रांती मोर्चातर्फे ४ एप्रिल रोजी भंडारा शहरात भीक मांगो आंदोलन करण्यात आले.

राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यापासून सर्वसामान्य नागरिक, गोरगरिब शेतकरी, विद्यार्थी व बेरोजगारांचे कोणतेही प्रश्न सुटू शकलेले नाही. प्रत्येक कुटुबाला पक्के घर असावे, याकरिता घरकूल योजना राबविली जात आहे. अनेक गरजू लाभार्थ्यांचे घरकूल यादीतून नाव वगळण्यात आले. काही लोकांचे घरकूल मंजूर झाले. परंतु राज्य शासनाने वेळेवर निधी न दिल्याने बांधकाम रखडले आहे. असे असताना कोट्यवधी रुपयांची संपती असलेल्या व सर्व सुख सुविधांचा उपभोग घेत असलेल्या आमदारांना सरकारतर्फे मुंबईत घर देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेला एकही नेत्यांनी कुठल्याही प्रकारचा विरोध केला नाही.

गोरगरिब नागरिक, शेतकरी व शेतमजूरांचा प्रश्न मार्गी लागत नसताना, पोलिस, आरोग्य कर्मचारी, वन कर्मचारी राज्य कर्मचा–यांसाठी सरकार जवळ पैसा नसताना, ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळत नसताना तसेच आमदार निवास असतानी सुद्धा आमदारांना मोफ त घरे देण्याची घोषणा करणे ही लज्जास्पत बाब असल्याचे ओबीसी क्रांती मोर्चातर्फे सांगण्यात आले. यावेळी आमदारांना दारिद्र रेषेखालील अंत्योदय राशन कार्डची सोय उपलब्ध करून द्यावे व एवढे करूनही आमदारांच्या गरजा भागत नसतील तर त्यांच्याकरिता ओबीसी क्रांती मोर्चाच्या वतीने जनतेला ते भीक मागून निधी संकलित केला जाईल व तो निधी मुख्यमंत्र्यांना पाठविला जाणार असल्याचे ओबीसी क्रांती मोर्चाचे संयोजक तथा अध्यक्ष संजय मते यांनी सांगितले. याकरिता भंडारा शहरात भिक्षाही मागण्यात आली.

यावेळी विनोद चौधरी, भाऊ कातोरे, नागेश माकडे, देविदास ठवकर, रमेश लांडगे, होमेश्वर लांजेवार, पुरुषोत्तम ठवकर, प्रमिला शहारे, आकाश कारेमोरे, शंकर कारेमोरे, निखिल सावरकर, आनंदराव मेश्राम, संजय वाघमारे, महेश ईलमकर, ज्ञानेश्वर मेश्राम, निकेश टेंभुणे आदी उपस्थित होते.

# दोषी वनरक्षक व वनमजूर निलंबित



**सडक–अर्जुनी :** वनपरिक्षेत्र कार्यालयअंतर्गत येणाऱ्या डोंगरगाव–डेपोसह वनक्षेत्रातील सतीटोला गावा जवळील कंपार्टमेंट क्रमांक–६६२ मध्ये गेल्या १५ दिवसांपूर्वी ६ सागवान झाडांची अवैध तस्करी करण्या त आल्याचे प्रकरण सध्या गाजत आहे. या प्रकरणात चौकशी अंती वनरक्षक व वनमजुरास अवैध वृक्षतोडप्रकरणी ३१ मार्च रोजी निलंबित करण्यात आले आहे.

तालुक्याची घनदाट जंगलासाठी ओळख आहे. त्यात शेंडा,जाभळी –दोडके, कोसमतोंडी, सौंदड, कोहमारा,रेंगेपार–पांढरी, मालीझुंगा व डव्वा परिसरात आजही मौल्यवान सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळतात. याच परिसरात लाकूड ठेकेदारांच्या माध्यमातून सागवान तस्करी तसेच काही वन कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वनांची कत्तल होत असल्याचे चित्र तालुक्यात पहावयास मिळत आहे. वनखात्याच्या माध्यमातून जंगलांचे रक्षण करण्यासाठी वन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून शासन कोट्यवधी रुपये खर्च करते, पण तालुक्यात वनरक्षकच भक्षक निघाल्याचे चित्र पाहावयास मिळत आह आली . त्या ६ सागवान झाडाच्या थुटांची किंमत ९५ हजार रूपये असल्याची माहिती वन अधिकाऱ्यानी दिली आहे.या प्रकरणाची माहिती मिळताच गोंदियाचे सहायक वनसंरक्षक अधिकारी प्रदीप पाटील (रोहयो, वन्यजीव) यांच्या मार्गदर्शनात येथील वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील मडावी, वनक्षेत्र अधिकारी गजानन सयाम यांच्या चौ कशीत ४ आरोपीं सह २ वन कर्मचारी दोषी आढळले आहेत. यामुळे उपवनसंरक्षक कुलराज सिंग यांनी वन कायद्यानुसार कारवाई करून वनरक्षक सोडगीर व वनमजूर लोखंडे यांना ३१ मार्च रोजी निलंबित केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**निलंबन काळात त्या दोघांना नवेगावबांध येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात जोडण्या त आले आहे. सडक–अर्जुनी ता लुक्या त अवैध वृक्षतो डप्रकरणी वन कर्मचा ऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अशा अवैध वृक्षतोडीच्या घटना होऊ नयेत, यासाठी कर्मचाऱ्यांनी सजग राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी क्षेत्र सहायकां नी सुद्धा आपले कर्तव्य पार पाडताना अशा घटना घडू नये, यासाठी लक्ष देण्याची गरज आहे.**

**-सुनील मडावी**
**वनपरिक्षेत्र अधिकारी, सडक–अर्जुनी**

# नाला सरळीकरणाचे काम न करताच लाखोंची अफरातफर



**गोंदिया:** गावातील मजुरांना गावातच काम मिळावे, या उद्दे–शाने मनरेगाची अंमलबजावणी केली जात आहे. या योजनेतंर्गत पांदण रस्ते, नाला सरळीकरण, तलाव खोलीकरण असे आदि कामे केली जातात. मात्र या योजनेची अंमलबजावणी करणारे रोजगार सेवक व यंत्रणेचे अधिकारीच काम न करता लाखो रूपयांची अरातफर करीत असल्याचा प्रकार पोवारीटोला या गावात समोर आला आहे. सन २०२१–२२ मध्ये मंजूर नाला सरळीकरणाचे काम झाले नसतानाही मस्टरमध्ये दाखवून त्यावरची कुशल व अकुशल कामाचा निधी उचल करण्यात आला आहे. या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

सविस्तर असे की, गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या पोवारीटोला येथे मनरेगा अंतर्गत सन २०२१–२२ मध्ये शेतकरी कुरंजेकर ते रूपचंद चौधरी यांच्या शेतापर्यंत नाला सरळीकरणाचे काम मंजूर झाले होते. नियमानुसार हे काम प्रत्यक्षात झालेच नाही. मात्र, रोजगार सेवक तारकेश्वर नानाजी चौधरी यानी २१ फेब्रुवारी २०२२ ते ६ मार्च २०२२ या कालावधीत नाला सरळीकरणाचे काम झाल्याचे दर्शवून बोगस हजेरी पथक सादर केले.

या बोगस प्रकाराला यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनीही सहकार्य केले. बोगस कामाच्या हजेरी पत्रकाला मंजूरी प्रदान करीत रोजगार सेवक व यंत्रणेच्या संगनमताने लाखो रुपए उचल करण्यात आले आहे. या प्रकारामुळे मनरेगा अंतर्गत यंत्रणेचा सुरू असलेला मालस–ुतो कार्यक्रम चव्हाट्यावर आला आहे. या प्रकाराची चौकशी करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन आयुक्त नागपूर, खा.सुनिल मेंढे, आ.विनोद अग्रवाल यांना गावातील सुज्ञ नागरिक सुनिल ब्राम्हणकर, पोलिस पाटील ओम ेश्वर चौधरी, मोतीलाल आंबेडारे, सेवक चौधरी, रामदयाल रहांगडाले, लक्ष्मीबाई गायधने यांनी स्वाक्षरीनिशी केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशीनंतर दोषीवर कोणती कारवाई होणार, याकडे लक्ष लागले आहे.

# उपविभागीय कार्यालयासमोर महागाईविरोधात काँग्रेसचे आंदोलन



**गोंदिया:** अनियंत्रित इंधन दरवाढ व वाढती महागाईमुळे सर्वसामान्यांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. असे असतांनाही मोदी सरकार सर्वसामान्यांविरुद्ध धोरण अवलंवित आहे. या विरुद्ध आज जिल्हा काँग्रेस कमेटीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान रस्त्यावर झुनका भाकर तयार करून मोदी सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. हे आंदोलन जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार दिलीप बंसोड, जिल्हा समन्वयक नाना गावंडे, तसेच जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या पाच राज्यात निवडणूक कार्यक्रम दरम्यान इंधन दरवाढ करण्यात आली नाही मात्र निवडणुका पार पडताच सर्वसामान्य विरोधी धोरणांचा अवलंब करीत मोदी सरकारने इंधन दरवाढ सुरू केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा फटका बसत आहे. जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वेगाने वाढत चालल्या आहेत. अशा परिस्थितीत सर्वसामान्य कुटुंबांनी उदरनिर्वाह कसा करावा, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. हे ग्रामीण भागातील जनतेची आर्त हाक आहे.

यासाठी काँग्रेस पक्षाने रस्त्यावर उतरून राज्यव्यापी आंदोलन कार्यक्रम हाती घेतला आहे, यानुरुप ३१ मार्च ते ७ एप्रिलपर्यंत तालुकास्तरापासून जिल्हास्तरापर्यंत महागाई व अनियंत्रित दरवाढी विरुद्ध आंदोलन केली जात आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड यांनी दिली. ४ एप्रिल रोजी उपविभागीय कार्यालयासमोर जिल्हा काँग्रेस कमेटीच्या नेतृत्वात इंधन दरवाढ व महागाईला घेवून एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनस्थळी ग्रामीण भागातील महिलांनी झुनका भाकर तयार करुन मोदी सरकारचा निषेध नोंदविला तर दुसरीकडे गॅस सिलिंडर, बैलजोडी रस्त्यावर आणून सर्वसामान्यांना बसत असलेल्या महागाईच्या फटक्याचे प्रदर्शन करण्यात आले. यानंतर कांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी मार्फत राष्ट्रपती व राज्याच्या मुख्यम त्र्यांना इंधन दरवाढ मागे घेण्यात यावी, महागाई आटोक्यात आणण्यात यावी अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा समन्वयक नाना गावंडे, जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड यांच्यासह जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनी केले. या आंदोलनात अंमर वराडे, जितेश राणे, अशोक गुप्ता, अमित भालेराव, रामेश्वर लिल्हारे, अँड. योगेश अग्रवाल, संदीप भाटीया, उषा मेंढे, उषा शहारे, पुष्पा खोटेले, वंदना काळे, विमल कटरे, राजु पालीवाल, पप्पू पटले, राजू काळे, गौरव बिसेन, देवचंद बिसेन, अनिल गौतम, परवेज बेग व सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## गोंदियात सम्राट अशोकांची जयंती शनिवारी

**गोंदिया:–** येथील भीम नगरच्या मैत्रीयबुद्ध, बुद्धविहारात सम्राट अशोकांची २३२६ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. मैत्रिय बुद्ध विहार समितीच्या वतीने हा कार्यक्रम शनिवारी (ता.९) सायंकाळी आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी भदंत तिस्सवंश महाथेरो, आणि भन्ते नागार्जुन हे मार्गदर्शन करणार आहेत.



या कार्यक्रमात भिक्षु संघांचे अभिवादन, उपासकांकडून त्रिशरण पंचशीला ग्रहण करून घेणे, संघदान आणि भिक्षुसंघाची देशना अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमात बहुजन समाजाच्या उपासकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अस्वलाच्या हल्ल्यात दोन बहिणी जखमी

**गोंदिया:–** सडक अर्जुनी वनपरिक्षेत्र कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सालईटोला गावालगत असलेल्या शेतशिवारात आज, ४ एप्रिल रोजी सकाळी एका अस्व–लाने दोन बहिणींवर हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली आहे.



सालईटोला येथील प्रेमा घनश्याम भोंडे (२०) व नेहा घनश्याम भोंडे (१७) या बहिणी आपल्या आईसोबत जंगलालगत असलेल्या स्वतःच्या शेतात मोहफुल वेचण्यासाठी गेल्या होत्या. दरम्यान, अस्वलाने मोठ्या बहिणीवर हल्ला केला. तिला वाचविण्यासाठी लहान बहीण धा–वली असता तिच्यावरही अस्वलाने हल्ला केला. यात दोन्ही बहिणी गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी सडक अर्जुनी ग्रामीण रुग्णालयात हलवून प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी गोंदिया येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच रेंगेपार सहवनक्षेत्राचे वन कर्मचारी सडक अर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालयात विचारपूस केली. जखमी मुलींना वन विभागाकडून तातडीने आर्थिकर्थि मदत मिळावी, अशी मागणी सालईटोला व परिसरातील नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात वनपरिक्षेत्राधिकारी सुनील मडावी यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळाली असून चौकशी करून शासकीय नियमानुसार जखमींना वनविभागाकडून मदत करण्यात येईल.


## जाहिर निविदा सुचना (पहिली वेळ)
## ग्रामपंचायत कार्यालय नवनितपूर
## पंचायत समिती अर्जुनी/मोर.

दिनांक:–०५/०४/२०२२

ह्या सुचने द्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते कि मासिक सभा ठराव क्रमांक ९/१ दिनांक २२/०३/२०२२ अन्वये ग्रामपंचायत नवनितपूर येथे विविध कामाकरीता निविदा आमत्रिंत करण्यात येत आहे.

**१) कामाचे नाव- सिमेंट रस्ता बांधकाम**
योजनेचा नाव –२५१५–१२३८ (मुलभूत सुविधा),अंदाजित किमंत–१००००००.००/–(१० लाख)
बुटाई क्र.२ येथे श्रीराम माहुर्ले ते गोविंदा हटवारच्या घरापर्यंत

**२)कामाचे नाव-स्मशानशेड**
योजनेचे नाव–जनसुविधा
अंदाजित किमंत–३०००००.००/–(तीन लाख)

**३)कामाचे नाव-स्मशानभूमी रस्ता खडीकरण करणे**
योजनेचे नाव–जनसुविधा
अंदाजित किमंत– ५०००००(पाच लाख)

सदर कामे करणेकरिता दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब–१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक ०६/०४/२०२२ ते दि.१२/०४/२०२२२ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक १२/०४/२०२२ ला दुपारी ठीक ०३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

**सदर निविदा हि दिनांक १३/०४/२०२२ ला (शक्य झाल्यास) मासीक सभेत सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.**

**पी.एम.पवार**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत नवनीतपूर**

**सौ.आशा दिनेश पालीवाल**
**सरपंच**
**ग्रामपंचायत नवनीतपूर**


# ३३० तीव्र कुपोषित तर ४८ दुर्धर आजाराचे बालक



**गोंदिया:** देशात स्वतंर्त्यांचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही गरीबी, कुपोषण मुक्त भारत करता आले नाही. ही बाब मिशन स्वस्थ बालक उपक्रमातंर्गत मार्च–२०२२ मध्ये विशेष शोध मोहिमेतून समोर आली आहे. गोंदिया जिल्ह्यात शुन्य ते सहा वर्ष वयोगटातील एकूण बालकांच्या २.३४ टक्के बालक कुपोषित आहेत, यामुळे खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात एकूण २३४९ कुपोषित बालकांपैकी ३०० बालके तीव्र तर ४८ बालके दुर्धर आजाराने ग्रस्त आहेत. यामुळे मिशन स्वस्थ बालक हा उपक्रम तरी जिल्ह्याला कुपोषणमुक्त करेल काय? असा सवाल उपस्थित होवू लागला आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाचा काळ लोटला आहे. त्यामुळे देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समता, बंधुत्व आणि धर्मनिरपेक्षता या तीन मुलभूत तत्वाचा आधारावर संविधान लागू करण्यात आला. मात्र, समतेचा प्रश्न आजही कायम आहे. गरीब व श्रीमंतामधील दरी कमी न होता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. परिणामी कुपोषित बालके जन्मास येत आहेत. यासाठी शासनाकडून गेल्या अनेक वर्षांपासून कसोसीचे प्रयत्न होत असले तरी ते प्रयत्न कागदोपत्रीच असल्याचे समोर आले आहे. आजघडीला दे–शात मिशन स्वस्थ बालक या उपक्रमाची अंमलबजावणी होत आहे. या अंतर्गत मार्च –२०२२ या महिन्यात जिल्ह्यात विशेष शोध मोहिमेतंर्गत स्क्रिनींग करुन कुपोषित, दुर्धर आजार, तीव्र कुपोषित तसेच शुन्य ते सहा वर्ष वयोगटातील एकूण बालक, सहा महिने ते सहा वर्ष वयोगटातील एकूण बालकांचा शोध घेण्यात आला.

गोंदिया जिल्ह्यात ० ते ६ वयोगटाच्या बालक संख्येच्या २.३४ टक्के बालक कुपोषित असल्याचे समोर आले. गोंदिया जिल्ह्यात एकूण २३४९ बालक कुपोषित आढळले. यातील ३०० बालके तीव्र कुपोषित तर ४८ बालके दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याचे समोर आले आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यात कुपोषण मुक्तीसाठी सुरू असलेले प्रयत्न सपशेल अपयशी ठरले आहे.

## 'सॅम व मॅम'चे बालके

**गोंदिया जिल्ह्यात सहा महिने ते ६ वर्ष वयोगटातील सॅम व मॅम श्रेणीचे एकूण २३०१ बालके आढळली आहेत. यामध्ये मॅम श्रेणीत गोंदिया तालुक्यात ५५१, आमगाव १९७, गोरेगाव ९६, अजुनी मोरगाव २३१, सडक अर्जुनी २४१, देवरी २९०, सालेकसा १९०, तिरोडा २०५ तर तीव्र कुपोषित (सॅम श्रेणी) चे एकूण ३०० बालके आढळली आहेत. यामध्ये गोंदिया तालुक्यात ८९, आमगाव २३, गोरेगाव १७, अर्जुनी मोरगाव ३६, सडक अजुनी २८, देवरी ५१, सालेकसा २४ व तिरोडा तालुक्यातील ३२ बालकांचा समावेश आहे.**

## दुर्धर आजारात गोंदिया तालुका अव्वल

**जिल्ह्यात एकूण ४८ बालके दुर्धर आजारी आढळले. यामध्ये गोंदिया तालुका अव्वलस्थानी आहे. गोंदिया तालुक्यात २३ बालक दुर्धर आजाराने ग्रस्त आहेत. तर आमगाव तालुक्यात ७, अर्जुनी मोरगाव तालुक्यात ६, सडक अर्जुनी ७, देवरी तालुक्यात ५ बालकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, गोरेगाव, सालेकसा व तिरोडा या तीन तालुक्यात दुर्धर आजारग्रस्त बालकांची संख्या निरंक आहे.**

# उष्णतेची लाट: मुकआपत्ती

साधारणपणे एप्रिल, मे व जून या तीन महिन्यात तापमान मोठ्याप्रमाणावर वाढलेले दिसते. या काळात अनेकदा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतो. यंदा मात्र मार्च महिन्यापासूनच तापमानात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उष्णतेची लाट व त्याच्या परिणामांपासून करावयाचा बचाव याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदे–शात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान हे तीन अंश सेल्सियसने अधिक असेल किंवा सलग दोन दिवस ४५ अंश सेल्सियस पेक्षा अधिक तापमान असेल अशा स्थितीला उष्णतेची लाट असे संबोधले जाते.

वातावरणातील बदलांमुळे सध्या पृथ्वीचे तापमान वाढते आहे. भारताच्या उत्तर भागात दरवर्षी उष्णतेच्या पाच ते सहा लाटा येतात. हे प्रमाणही वाढते आहे. १९९२ ते २०१५ या काळात आपल्या देशात २२ हजार ५६२ लोकांना उष्णतेच्या लाटेमुळे जीव गमवावा लागला आहे. या सोबतच पक्षी, प्राणि, वनस्पती यांची हानीही मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामुळे उष्णतेची लाट ही एक मुक आपत्ती मानली जाते. त्यामुळे होणारे नुकसानही मोठे असते.

वातावरणाचे तापमान ३७ अंश सेल्सियस असेपर्यत मानवाला काही त्रास होत नाही. त्यानंतर मात्र मानवी शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते. त्याचे विपरित परिणाम मानवी शरीरावर होतात. तापमान आणि आर्द्रता यांचा मिळून होणारा परिणाम अधिक असतो. उदा. प्रत्यक्ष तापमान ३४ अंश सेल्सियस असेल पण आर्द्रता ७५ टक्के असेल तर तापमान निर्देशांक ४९ अंश सेल्सियस इतका असतो म्हणजे व्यक्तिला ते तापमान ४९ अंश सेल्सियस इतके त्रासदायक ठरते.

कृती योजना आणि कलर कोडिंग त्यासाठी उष्णतेची लाट आणि त्यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी उष्मा प्रतिबंधक कृती योजना आखणे आवश्यक असते.

या कृति योजनेत महत्त्वाचे मुद्दे म्हणजे– उष्णतेची लाट ही एक आपत्ती आहे हे मान्य करणे, या लाटेमुळे ज्यांचे नुकसान होणार आहे असे समाजगट ओळखणे, सार्वजनिक थंडाव्याच्या जागा निर्माण करणे, विविध माध्यमांद्वारे उष्णतेच्या लाटेबाबत सावधानतेचे इशारे समाजाला देणे.

हवामान विभागामार्फत वेळचेवेळी असे संदेश दिले जा–तात. त्यासाठी कलर कोडिंग पद्धत वापरणे सुरु केले आहे. पांढरा रंग– सामान्य दिवस (नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा कमी तापमान), पिवळा रंग– उष्ण दिवस (नेहमीच्या कमाल तापमाना एवढे तापमान), केशरी रंग– उष्णतेची मध्यम स्वरुपाची लाट(नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा ४ ते ५ अंश सेल्सियस जास्त तापमान), लाल रंग– अत्यंत उष्ण दिवस(नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा ६ अंश सेल्सियस किंवा त्यापेक्षा जास्त तापमान)

### अतिजोखमीच्या गटांची काळजी

उष्णतेच्या लाटेचा धोका ज्या व्यक्तिंना आहे त्या व्यक्तिंमध्ये उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती, लहान बालके, मुले, स्थूल व्यक्ति, अयोग्य परिधान केलेले लोक, पुरेशी झोप न झालेल्या व्यक्ति, गरोदर महिला, अनियंत्रित मधुमेह, हृदयरोग, अपस्मार रुग्ण, दारुचे व्यसन असणारे लोक, काही विशिष्ट औषधी घेत असलेले लोक, बेघर लोक इ. गटांतील लोकांचा समावेश होतो. या अतिजोखमीच्या गटातील लोकांनी आपली काळजी घेणे आवश्यक आहे, तसेच समाजातील इतर घटकांनीही या लोकांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

### सार्वजनिक सुविधा निर्मिती आवश्यक

उष्णतेमुळे होणारा शारिरीक त्रास किरकोळ ते गंभीर स्वरुपाचा असू शकतो. किरकोळ त्रासाच्या स्वरुपात शरिरावर उष्णतेमुळे रॅशेश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशा स्वरुपाचा त्रास असतो. गंभीर प्रकारात उष्माघात होतो. यात व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो.

उष्णता लाटेस प्रवण भागात खालील प्रमाणे सार्वजनिक सुविधांची निर्मिती करणे आवश्यक असते.

१)सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे (उदा. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजार, धार्मिक ठिकाणे, बँका, प्रेट्रोल पंप, मुख्य रस्ते इ.)

२)लोकांना थांबण्यासाठी थंड सावलीच्या जागा निर्माण करणे.

३)सार्वजनिक उद्याने, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर लोकांसाठी खुल्या ठेवणे.

४)छतांना उष्णता विरोधी रंग लावणे.

५)कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्या कामकाजाच्या वेळा बदलविणे.

६)उष्णतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत लोकांचे प्रबोधन करणे.


### उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी: हे करा–

१)पुरेसे पाणी प्या. प्रवास करत असाल तर पाणी सोबत ठेवा.

२)हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरा. उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरा.

३)उन्हात जातांना टोपीखाली ओलसर कपडा ठेवा.

४)पाळीव प्राण्यांचा सावलीत, थंडाव्याच्या ठिकाणी ठेवा.



५)ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा.

**हे करु नका–**

१)शक्यतो उन्हाच्या वेळेस घराबाहेर जाणे टाळा.

२)कष्टाची कामे उन्हात करु नका.

३)पार्क केलेल्या वाहनात मुलांना ठेवू नका.

४)गडद रंगाचे व तंग कपडे वापरु नका.

५)उन्हाच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाक घर हवेशीर ठेवा.

६)मद्य, चहा, कॉफी, सॉफ्ट ड्रिंक्स टाळा.

७)खूप प्रथिने युक्त अन्न तसेच शिळे पदार्थ खाऊ नका.

यासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांनीही आपापल्या स्तरावर तसेच सर्व यंत्रणांनी मिळून सहयोगाने उपाययोजना कराव्या. नागरिकांपर्यंत सुचना पोहोचवून त्यांना सावध करणे ही आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपापल्या कुटुंबाची काळजी घ्यावी.

**–संकलन:**
**जिल्हा माहिती कार्यालय, अकोला**

# "महाज्योती"ला गेल्यावर्षीच्या तुलनेत ५० कोटी कमी निधी, विद्यार्थी टॅबच्या प्रतिक्षेतच

**गोंदिया :** ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या योजना राबवणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेला (महाज्योती) पुढील वर्षासाठी २५० कोटी रुपये दिले जाणार आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत ही रक्कम ५० कोटींनी कमी आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी महाज्योतीला २०२१-२२ या वर्षाकरिता १५० कोटींचा निधी मंजूर केला होता. त्यानंतर आणखी १५० कोटींची वाढ केली होती. अशाप्रकारे ३०० कोटी महाज्योतीला मिळाल होते. आता २०२२-२३ या आर्थिक वर्षात २५० कोटी रुपये अर्थसंकल्पात मंजूर केले आहेत. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली ११ ऑगस्ट २०२० ला महाज्योतीचे संचालक मंडळ निर्माण करण्यात आले. तो करोनाचा कालखंड होता. अत्यंत कमी मनुष्यबळ होते.

अशावेळी विद्यार्थी हिताच्या विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेण्याचे आव्हान समोर होते. या संस्थेने अशा योजना विनामूल्य सुरू केल्या. यात एमपीएससी, यूपीएससी, पोलीस परीक्षा प्रशिक्षण, पीएचडी संशोधक फेलोशिप या योजना आहेत. सोबतच ग्रामीण भागातील अकरावी विज्ञानमध्ये शिकणाऱ्या व इंजिनिअरिंग, मेडिकल प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणाऱ्या दहा हजारांवर जेईई नीट प्रशिक्षणार्थींना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण, मोफत ब्रँडेड कंपनीचा टॅब व दररोजचे सहा जीबी मोफत इंटरनेट ही योजना सुरू करण्यात आली आहे. महाज्योतीचे स्वतःचे प्रशासकीय कार्यालय नागपूर मुख्यालयी व्हावे म्हणून वडेट्टीवार यांनी, सिव्हिल लाईनमधील पाच एकर जागा जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळवून दिली. या जागेची किंमत म्हणून २६ कोटींचा भरणा केला.

## सर्व विभागात कार्यालय

महाज्योतीचे विभागीय कार्यालय सर्व महसूल विभागात सुरू करण्यात येत आहेत. औरंगाबाद, नाशिक व पुणे येथे सुरू झालेल्या महाज्योतीच्या विभागीय कार्यालयासाठी, शासनाच्या जागा मिळवण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे रितसर प्रस्ताव सादर केले आहेत. आवश्यकतेनुसार निधी पुन्हा वाढवून दिला जाईल. त्यासाठी संचालक मंडळ पाठपुरावा देखील करीत असते, असे महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांना टॅब कधी मिळणार

ग्रामीण भागातील अकरावी विज्ञानमध्ये शिकणाऱ्या व इंजिनिअरिंग, मेडिकल प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणाऱ्या १२ हजारांवर जेईई नीट प्रशिक्षणार्थींना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण, मोफत ब्रँडेड कंपनीचा टॅब व दररोजचे सहा जीबी मोफत इंटरनेट ही योजना महाज्योतीच्यावतीने सुरू करण्यात आली असली तरी अद्यापही यावर्षीच्या १२ हजार विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण करण्यात आलेले नाही. जेव्हा की या विद्यार्थ्यांनी खासगी कोचिंग क्लासेस सुरु करुन अभ्यासाला सुरवात केली आहे. त्यामुळे टॅबचे वितरण कधी होणार असा प्रश्न स्टुडंटस राईट असो.चे अध्यक्ष उमेश कोर्राम, ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे यांनी अशा प्रश्न उपस्थित केला आहे.

# दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्ह्याला ११ कोटींचा निधी



**गोंदिया:** शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत जिल्ह्याला मिळत असलेला निधी मागील दोन वर्षापासून प्रलंबित होता. यामुळे दलित वस्त्यांमधील अनेक कामे रखडून पडली होती. या संदर्भात आ.विनोद अग्रवाल यांच्याकडे तक्रार येताच त्यांनी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाशी सतत पाठपुरावा केला. या पाठपुराव्याचे फलित म्हणून मागील दोन वर्षापासून प्रलंबित असलेला ११ कोटीचा निधी गोंदिया जिल्ह्याला मिळाला आहे. यामुळे, रखडून पडलेली कामे पूर्णत्वास येणार आहेत.

राज्य शासनाकडून दलित वस्त्यांच्या सुधार व पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येते. या निधीतून दलित वस्त्यात विकासकामे केली जा-तात. गोंदिया जिल्ह्याला मिळणारा निधी मागील दोन वर्षांपासून रखडून पडला होता. सन २०१८-१९ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहायता विभागाच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (राज्यस्तरीय दलित वस्ती) अंतर्गत ३९६ कामे मंजूर करण्यात आले होते. परंतु, निधी उपलब्ध नसल्याने ही कामे पूर्णत्वास होवू शकली नाही. अनेक कामे रखडून पडली. याची तक्रार आ.विनोद अग्रवाल यांच्याकडे करण्यात आली.

दरम्यान आ.विनोद अग्रवाल यांनी या संदर्भात लक्ष देवून राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी सतत पत्र व्यवहार करून पाठपुरावा केला. तसेच या प्रकरणाला घेवून सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे साकडे घातले. व अडकलेला निधी जिल्ह्याला द्यावा, अशी मागणी केली.

आ.विनोद अग्रवाल यांनी सामाजिक न्यायमंत्री मुंडे यांची भेट घेतल्यानंतर गोंदिया जिल्ह्या-तील दलित वस्ती योजनेचा प्रलंबित निधी मिळाला आहे. जिल्ह्यातील ३९६ कामांसाठी राज्य शासनाकडून ११ कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे, प्रलंबित कामे पूर्णत्वास होण्याचा मार्ग मोकळा झाला असून निधी उप-लब्ध झाल्याने अधिकाऱ्यांनी त्वरित कामांना गती देवून वेळेत पूर्ण करण्याचे सुचना आ. विनोद अग्रवाल यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

निधी उपलब्ध झाल्याने प्रलंबित कामे पूर्ण होणार असून नागरिकांच्या समस्या मार्गी लागण्यात मदत होणार आहे. यामुळे आ. विनोद अग्रवाल यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

# मातोश्री ग्राम समृद्धी योजनेतून मिळणार रोजगार



**गोंदिया:** मजुरांना त्यांच्या गाव परिसरातच काम मिळावे या उद्दे-शाने महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत प्रस्तावित पांदन रस्त्यासाठी राज्य शासनाच्या नियोजन विभागाने मातोश्री ग्राम समृद्धी योजने ग्राम समृद्धी योजने अंतर्गत २०२२-२३ या वर्षात १०३ पांदण रस्त्याच्या कामांना मान्यता प्रदान केली आहे. या माध्यमातुन जिल्ह्यातील हजारो मजुरांच्या रोजगाराचा मार्ग सुकर झाला आहे.

विशेष म्हणजे यासाठी राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी राज्याशासनाकडे पाठपुरावा केला होता. राज्याच्या नियोजन विभागाने २९ मार्च रोजी मातोश्री ग्राम समृद्धी शेत पांदण रस्त्यातर्गत जिल्ह्यातील १०३ पांदण रस्त्यांच्या कामांना मान्यता प्रदान केली आहे. हि कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत करण्यात येणार आहे. मान्यता प्राप्त पांदण रस्त्याच्या माध्यमातून प्रति १ किमी या प्रमाणे १०३ किलोमीटरचे बांधकाम करण्यात येणार आहे.

यात गोंदिया तालुक्यातील ४६ पांदण रस्ते, ते तिरोडा १०, गोरेगाव १२, आमगाव १,सडक अर्जुनी जु १२, सालेकसा १, देवरी ३ व अर्जुनी जु मोरगाव तालुक्लुयातील ९ पांदण रस्त्यांचा समावेश आहे. या पांदण रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतीची साहित्य ने- आन करण्याकरिता सोयीस्कर होणार आहे. तसेच या माध्यमातून जिल्ह्यातील हजारो मजुरांना काम मिळणार आहे.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासा सह दरडोई उत्पादनातून प्रत्येक नागरिक विकासाच्या मुख्य प्रवाहात यावा या दृष्टीकोनातून आपण प्रयत्नशील आहेत. जिल्ह्यातील नागरी भागासह ग्रामीण क्षेत्राच्या विकासात भर पडावी यासाठी जास्तीत जास्त कामे व निधी खेचून आणुन गोंदिया-भंडारा जिल्ह्याचा काया पालट करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करीत असल्याचे पटेल यांनी सांगीतले.

# अँड. साळवेंचा बालकल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यपदाचा राजीनामा



**नागपूर:** महिला व बालविकास विभागाची बालक व बालकल्याण समित्यांप्रती, असलेली अनास्था, असंवेदनशीलता व दुर्लक्षित कार्यप्रणालीमुळे बालकांना त्यांच्या न्यायिक अधिकारापासून वंचित राहावे लागत आहे. महिला व बाल विकास विभागाच्या अशा दुर्लक्षित व भोंगळ कारभाराला वैतागून डॉ. अँड. अंजली साळवे यांनी बालकल्याण समिती सदस्य पदाचा अखेर राजीनामा दिला.

गत वर्षभरापासून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील बालकल्याण समित्यांच्या अध्यक्ष व सदस्य पदाच्या नियुक्त्या रखडल्या आहेत. त्यातच नागपूर व गोंदिया येथील बालकल्याण समितीत अध्यक्ष व सदस्यांच्या अभावामुळे डॉ. अँड. अंजली साळवे या एकाच सदस्यावर या दोन्ही जिल्ह्याचा अतिरिक्त भार होता. बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बाल कल्याण समिती ही बेंच म्हणून कार्य करते. परंतु बालकल्याण समिती, नागपूर व गोंदिया समितीचे अध्यक्ष व सदस्यांची उपलब्धता नसल्याने बालकांच्या संबंधित अर्जावरील निर्णयासंबंधी बाल न्याय अधिनियम २०१५ व नियम २०१८ च्या तरतुदीनुसार निर्णय प्रक्रिया व आदेशाबाबत अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने निव्वळ महिला व बाल विकास विभागाची असलेली अनास्था, असंवेदनशीलता व दुर्लक्षित कार्यप्रणालीमुळे बालकांना त्यांच्या न्यायिक अधिकरापासून वंचित राहावे लागत असल्याने महिला व बाल विकास विभागाच्या दुर्लक्षित व भोंगळ कारभाराला वैतागून डॉ.अँड. अंजली साळवे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

## जिल्ह्यात कोरोना बाधित शुन्य

गोंदिया-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ५ एप्रिल रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या शुन्य आहे. आजपर्यंत ४६,२११ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले.४५,४८९ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली. जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या शुन्य आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ५८८ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.४४ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२७ टक्के आहे.

# दुभंगलेल्या कुटुंबांना जुळवून बांधली रेशीमगाठ



**गोंदिया:** तंटामुक्त समिती ही केवळ गावातील नागरिकांचे तंटेच सोडवत नाही तर गावात अनेक सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांना नवी प्रेरणा देत असते. त्यातच आता दोन दुभंगलेल्या कुटुंबाची मने जुळवून त्यांच्या पाल्यांची लग्नगाठ बांधून देत समाजात एक आदर्श निर्माण केल्याची किमया गोंदिया तालुक्यातील ढाकणी येथील तंटा मुक्त समितीने घडवून आणली. तंटामुक्त समितीने केलेल्या समाजपयोगी कार्यासाठी या समितीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

ढाकणी येथील किरण राऊत नामक मुलाचे गोंदिया स्थित मीना नामक मुलीशी लग्न जुळले.या दोघांचा साखरपुडा त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या थाटामाटात उरकवला. तसेच मार्च महिन्याच्या शेवटची तारीख ठरवून त्यांच्या लग्नाचा बार हि उडविण्याची तयारी या दोन्ही वर वधूच्या कुटुंबियांनी आखली होती. परंतु लग्नाला दहा दिवस उरले असतानाच दोन्ही कुटुंबात बिनसले व सदर ठरलेले लग्न मोडीत काढण्याचे निश्चित झाले.

बोहल्यावर चढण्यापूर्वीच भावी वर वधूचे स्वप्न भंगणार हि बाब निश्चित झाली. शुल्लक कारणासाठी लग्न मोडणे हि बाब भावी वर वधूंना पसंत पडली नाही. त्यामुळे त्यांनी सदर निर्णय मागे घेण्यासाठी आपल्या कुटुंबियांना पालथे घातले. परंतु कुटुंबियांनी भावी वर-वधूचे एकही म्हणणे ऐकून घेतले नाही. आणि शेवटी ठरलेले लग्न मोडीत ठरले. परंतु दोन्ही भावी वर-वधू यांनी यातून मार्ग काढण्यासाठी ढाकणी येथील तंटामुक्त समितीचे निमंत्रक प्रीतम मेश्राम यांच्याशी भेट घेऊन त्यांना आपली आपबीती कळविली व लग्न जुळवून आणण्याची विनंती केली. येथील तंटामुक्त समितीने तात्काळ याची दखल घेत दोन्ही कुटुंबांना पाचारण करून व त्यांचे समुपदेशन करीत मनोमिलन जुळवून आणले. व आपल्याच गावातील महादेव पहाडीवर गुरुवारी(ता.३१) मोठ्या थाटामाटात सामाजिक रितिरिवाजाप्रमाणे दोन्ही कुटुंबीयांच्या साक्षीने दोन्ही जीवांची रेशीमगाठ बांधून दिली.

यावेळी नवं वर-वधूना समितीतर्फे पाच जीवनावश्यक वस्तू भेट स्वरूपात देण्यात आल्या. दुभंगलेल्या दोन्ही कुटुंबीयात मनोमिलन घडवून आणण्यासाठी या समितीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. या समाजपयोगी कार्यासाठी येथील तंटा मुक्त समितीचे अध्यक्ष हंसराज लिल्हारे, निमंत्रक प्रीतम मेश्राम, सदस्य रवीशंकर मस्करे, देवलाल मस्करे, सुनिल हिरापुरे, सचिन पालादुरकर,ओमप्रकाश मेश्राम, मोहारे गुरुजी, सुनिल क्षीरसागर, सुदन नागपुरे, प्रफुल्ल ठवरे,भोजराज नागपुरे, कुवरलाल नागपुरे, अनिता डाहारे,मोहिनी मेश्राम, सतिकाबाई मेश्राम, जयवंता चनाप, अनेकसिंग बिरनवार यांनी मोलाचे सहकार्य केले.

# जि.प.शाळा व आरोग्य केंद्रातील रिक्त पदे त्वरित भरा

## ग्रा.पं.पदाधिकाऱ्यांचे शिक्षणाधिकारी व डीएचओला निवेदन



**एकोडी:** स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य सेविका व आरोग्य सेवकांचे पदे रिक्त आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील ५ शिक्षकांचे पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे आरोग्यसेवा व शिक्षण प्रभावित होत आहे. याकरिता दोन्ही संस्थांतील रिक्त पदे त्वरित भरण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन एकोडी ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दिले आहे.

एकोडी हे गाव केंद्र आहे. यामुळे येथील शासकीय संस्थांशी परिसरातील १० ते १२ गावातील नागरिकांसह विद्यार्थ्यांचा थेट संबंध येतो. यामध्ये दांडेगाव, सहेसपूर, गंगाझरी, मजी-तपूर, खडबंधा, धामनेवाडा, रामपूरी, डोंगरगाव, किडंगीपार, बरबसपुरा, काचेवानी, बेरडीपार, सोनगाव, नहरटोला, सेजगाव या गावांचा प्रामुख्याने समावेश आहे. एकोडी येथे जि.प. प्राथमिक व जि.प. माध्यमिक तसेच कनिष्ठ महाविद्यालय आहे. मात्र या शाळांमध्ये एकूण ६ शिक्षकांचे पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील १ वर्षांपासून एक आरोग्य सेविकेचे पद रिक्त आहे. तर एकोडी व दांडेगाव येथील उपकेंद्रामध्ये ६ वर्षांपासून आरोग्य सेवकाचे प्रत्येकी एक पद रिक्त आहे. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेवेवर परिणाम पळत आहे. या दोन्ही संस्थांचे रिक्त पदे भरण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन १ एप्रिल रोजी ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी जि.प.च्या अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी सरपंच शालुताई चौधरी, उपसरपंच वर्षा अंबुले, पुरुषोत्तम भदाडे, राकेश बिसेन, जगजीवन वघारे, शबनम पठाण, वहिदा शेख, संगीता वरठी, संगीता रिनायत, रंजू पटले आदि उपस्थित होते.

# अ.भा.साहित्य परिषदेच्या विदर्भ प्रांत अध्यक्षपदी अॅड.लखनसिंह कटरे



**गोंदिया:** राष्ट्रीय पुनर्निर्माणाचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेऊन साहित्याच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या राष्ट्रीय स्तरा-वरील अखिल भारतीय साहित्य परिषद या संघटनेची विदर्भ प्रांताची कार्यकार्यरिणी नुकतीच गठीत करण्यात आली. या कार्यकार्यरिणीत विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिक अॅड. लखनसिंह कटरे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कार्यकार्यरिणीत ज्येष्ठ पत्रकार, स्तंभलेखक आणि साहित्यिक अविनाश पाठक यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विदर्भ प्रदेश महामंत्री म्हणून विधिज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व कवी अॅड. सचिन नारळे हे कार्यभार सांभाळणार आहेत. तसेच परिषदेचे गोंदिया जिल्हा प्रतिनिधी म्हणून गोवर्धनर्ध बिसेन यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी निवड झालेले अॅड. लखनसिंह कटरे हे महाराष्ट्र शासनाच्या सहकार पणन आणि वस्त्रोद्योग विभागातून राजपत्रित अधिकारी म्हणून निवृत्वृत झाले असून सध्या गोंदिया जिल्ह्यात वास्तव्याला आहेत. त्यांचे मराठी आणि हिंदीत १४ ग्रंथ प्रकाशित झाले असून आगामी ६ पुस्पुतके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. अखिल भारतीय पोवारी बोली साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषभूविले असून राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे मानद सदस्य म्हणून ही त्यांनी काम केले आहे. त्यांच्या प्रदीर्घ वायय सेवेसाठी त्यांना विविध प्रतिष्ठित पुरपुस्कारानेही सन्मानित करण्यात आलेले आहे. या कार्यकार्यरिणीचा कार्यकाळ एक वर्षासाठी राहणार आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष साहित्यिक प्रवीण दवणे, कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र पाठक, उपाध्यक्ष नितीन केळकर, प्रदेश महामंत्री डॉ. बळीराम गायकवाड व प्रदेश संघटनमंत्री सुनील वारे आदींनी नवनिर्वाचित कार्यकार्यरिणीतील सदस्यांचे अभिनंदन केले असून त्यांना त्यांच्या कार्यकार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत

# विकास कामांचे आमदार रहांगडाले यांच्या हस्ते भूमिपूजन

**तिरोडा::-** आमदार विजय रहांगडाले यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत रस्ता ३.०० व सभामंडप बांधकामाकरिता ५.०० लक्ष मंजूर झाले असून या विकासकामाचे भूमिपूजन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले यावेळी प्रमाख्याने नव निर्वाचित जी.प. सदस्या अंजली अटरे, दवणीवाडा मंडळअध्यक्ष धनेन्द्र अटरे, प.स. सदस्य अजाब रिनाईत विद्यकलाबाई पटले,नरेंद्र टेंभरे, राजेश उरकुडे, नेहरू उपवंशी, बंटी श्रीबानश्री, परमानंद मेश्राम, हृदय शरनागत, चैनलाल पटले, भोजलाल टेंभरे, राकेश अटरे, धर्मराज पुराम, मंगलेश गिरी, महेंद्र कटरे,प्रवीण बोपचे व नागरिक उकपस्थित होते.



# प्रत्येक गरजूला धान्य मिळावे : आ.अग्रवाल

## २२ हजार लाभार्थ्यांचा वाढीव रेशन कोटा मंजूर



**गोंदिया:** भारतातील प्रत्येक गरजू नागरिकाला अन्नधान्य मिळावे आणि त्याचे कुटुंब उपाशी राहू नये यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत २०१३ मध्ये रेशन योजना सुरु करण्यात आली होती. मात्र ही योजना सुरु होऊनही गोंदिया जिल्ह्यात अशी अनेक कुटुंबे होती ज्यांना शासनाच्या योजनेपासूनसू वंचित राहून त्याचा लाभ घेता आला नाही. यासंदर्भात आ. विनोद अग्रवाल यांनी केलेल्या शासन, प्रशासनाकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून जिल्ह्यातील २२ हजार लाभार्थ्यांचा रेशन कोटा मंजूर झाला आहे.


आमदार अग्रवाल यांनी अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या पुढे जिल्ह्यातील प्राथमिक कुटुंब लाभार्थी व अंत्योदय योजनेच्या कार्डधाऱ्कांच्या संख्येत रेशन कोट्यात कपात केल्याने रेशनचा लाभ गरजूंना मिळत नसल्यामुळे ही समस्या मांडून रेशनच्या कोट्यात वाढ करण्याची मागणी केली होती. प्रसंगी ना.भुजबळ यांनी जिल्ह्यातील लाभार्थ्यांना न्याय दिला जाईल, रेशनचा कोटा वाढविला जाईल, असे आश्वासन दिले होते. ते या आश्वासनाच्या पूर्तता अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभागाने १२ फेब्रूवारी २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन पंतप्रधान कुटुंब योजनेंतर्गतर्ग रेशन कोट्यात वाढ केली आहे.

याअंतर्गत अंत्अंयोदय लाभार्थी कार्ड योजनेच्या प्राथमिक कुटुंब लाभार्थ्यांची संख्या २० हजारांनी आणि अंत्अंयोदय कार्डधारक लाभार्थ्यांची संख्या २ हजारांनी वाढवून मोठा दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात सद्यस्थितीत ६ लाख ९४ हजार ५६० प्रा थमिक कुटुंब लाभार्थी संख्या असून ८० हजार १९१ अंत्अं योदय कार्डधारक आहेत. दरम्यान राज्य शासनाने जिल्ह्याला वाढीव रेशन कोटा मंजूर केल्याबद्दल आ. अग्रवाल यांनी ना. भुजबळ यांचे आभार व्यक्त केले. तसेच ration quota गरजू कुटुंबांचे येणारे अर्ज पूर्ण करून त्यांना रेशन सुविधेचा लाभ देण्याचे निर्देश त्यांनी अन्न पुरवठा विभागाला दिले आहे.

# वेदनावरील संयम म्हणजे दुःखातून मुक्तीचा मार्ग

**गोंदिया:-** वेदनानंवर संयम ठेवा म्हणजे दुःखातून मुक्ती मिळते असे विचार प्रबोधनकार एस. एन. संकल्प यांनी मांडले. बुद्धिस्ट समाज संघाच्या वतीने संथागारात आयोजित ३७८ व्या संडे असेम्बली दरम्यान ते बोलत होते. आयु. संकल्प यांनी बुद्धाने प्रतिपादित केलेल्या ४ आर्य सत्य आणि विप्स्सणा या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं. प्रबोधनकार पुढे बोलताना म्हणाले की, प्रत्येक व्यक्तींनी अहंकार आणि अभिमान या दोहोंचा त्याग केला पाहिजे, कारण जो पर्यन्त "मैं" हा शरीरात वास्तव्याला आहे तो पर्यन्त निर्वाण प्राप्त होत नाही. शरीराच्या पायाभूत गरजा पूर्ण करत करत व्यक्ती निर्वाण प्राप्त करू शकतो असा युक्तिवाद त्यांनी करून विविध उदाहरणांनी स्पष्ट केलं.



ते पुढे म्हणाले की, भावचकरातून मुक्ती मिळविण्यासाठी १० पारमितांची गरज आहे, त्यामुळे सर्व बुद्धिष्टनी पारमितेचे पालन करावे कारण जे पंचशीलाचे पालन करतात त्यांची साधना चांगली असते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चार आर्यसत्य आणि अष्टांगिक मार्ग हे दुःख निवारण्याचे साधन आहे असा सल्ला त्यांनी याप्रसंगी दिला. दरम्यान बुध्दवंदना करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. तदनंतर डॉ.कान्हेकर साहेब आणि जिल्हा क्रीडा अधिकारी श्री मरस्कोल्हे साहेब यांनी इ४ अर्थात भारतीय संविधान सन्मान सुरक्षा संवर्धन ही काळाची गरज आहे, यावर त्यांनी मार्गदर्शन केलं. आयु. गौतम गजभिये यांनी संचालन केले. सर्वांचे भले हो, माझंही भले हो या धम्मगाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. वैद्य कुटुंबाकडून लज्जतदार भोजनदान करण्यात आलं. यावेळी बुद्धिस्ट समाज संघांचे उपासक उपस्थित होते.

# आमदार चषक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन



**सडक अर्जुनी:** गोंदिया जिल्हा कबड्डी असोसिएशन व ललिताबाई बहुउद्देशिय सेवाभावी संस्था मोहगाव/तिल्ली च्या वतीने आयोजित आमदार चषक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा स्थानिक गोंडवाना मंडळाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली होती. कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन आ.मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटात पार पडले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सडक अर्जुनीचे नगराध्यक्ष तेजराम मडावी, उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, नपं सभापती अनिल राजगिरे, बांधकाम सभापती महेंद्र वंजारी, सभापती कामिनी कोवे, जिल्हा हौसी कबड्डी असोसिएशनचे सचिव एस.ए. वहाब, न.प.चे कर व प्रशासकीय अधिकारी निहाल नाईकवडी, सपोनि पांढरे, नगरसेविका दिक्षा भगत, माजी जि.प.सदस्य रमेश चुऱ्हे, पं.स.सदस्य डॉ.सुखीराम वाढई, तुलाराम चंद्रिकापुरे, इंजी.ओमेश कापगते आदि मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कबड्डीच्या मैदानातील फित कापून स्पर्धेचे रितसर उद्घाटन करण्यात आले. खेळाच्या माध्यमातून गुणात्मक बदल घडवून आणून कुठल्याही खेळात स्वतः मधील गुणवत्ता सिध्द कशी करता येईल, याकडे लक्ष देणे गरजेचे असून नेतृत्व कौशल्य जर जमले तर देशपातळीवर कबड्डीचे नेतृत्व आपल्याला करता येईल, असे मनोगत आ.मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख मान्यवरांचे पुष्प, वृक्ष व स्मृतिचिन्ह देवून स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करून आमदार चषक कबड्डी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस.ए. वहाब यांनी तर संचालन आशिष येरणे यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य क्रिडाप्रेमी व नागरिक उपस्थित होते.